

नातेपुते नगरपंचायतीकडून नागरिकांचा विश्वासघात का? - पाटील PII

● पंढरपूर ● रविवार, १६ फेब्रुवारी २०२५
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | ● वर्ष २९ ● अंक - २६७





राज्यसेवा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचा सत्कार PIII

**» At a Glance**

## सांगोला शहरात खुले आम गुटकाविक्री

**सांगोला :** सांगोला शहर हे गुटखा विक्रीचे



मध्यवर्ती केंद्र असून गुटखा साठवण्याचे गोदामदेखील शहरांमध्ये आहेत. काही घरांमध्येदेखील गुटखा साठवून ठेवला जातो. गोळी बिस्कीट विक्रीच्या नावाखाली गुटख्याचा धंदा फोफावला आहे.यापूर्वी अनेक वेळा शहरात गुटखा विक्री करणाऱ्या दुकानांवर धाडी टाकून लाखो रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला होता.

मात्र सांगोला शहरातील गुटखा विक्रीचे केंद्र काही बंद झाले नाही. शहरात गुटखा विक्री करणारा मुख्य सूत्रधार असून त्यांच्यामार्फत शहरामधील पान टपऱ्या किराणा, दुकानदार यांना मोटारसायकल व सायकलवरून पुरवठा केल्या जातो.

महाराष्ट्र शासनाने गुटखा विक्रीवर बंदी टाकलेली असतानाही शहरात मात्र सर्रास विक्री केली जात असताना अन्न व भेसळ विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे.

## सिग्नलवरील झेब्रा क्रॉसिंग-वर पोलिसांचे दुर्लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहरातील आसरा



चौक, जुना बोरामणी नाका, शांती चौक, रंगभवन चौक, सिव्हिल चौक, गांधी नगर या प्रमुख चौकांमध्ये वाहनांची वर्दळ सर्वाधिक आहे. वाहतूक नियमनासाठी तेथे सिग्नल बसविले आहेत. सिग्नल बंद होईल आणि आपण वाहनांच्या गर्दीत अडकून राहू नये म्हणून सिग्नलवरील झेब्रा क्रॉसिंगवर वाहने थांबलेली दिसतात. त्यातच ते चौक अरुंद आणि जड वाहतूक सुरू, यामुळे अपघात होण्याची शक्यता बळावू लागली आहे. चौकात वाहतूक पोलिस असताना देखील सिग्नलवरील झेब्रा क्रॉसिंगवरील वाहनांवर कारवाई होत नाही. सोलापूर शहरातील रस्त्यांवरून ये-जा करणाऱ्या प्रत्येक वाहनधारकास स्वयंशिस्त लागावी म्हणून सिग्नल यंत्रणा सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत सलग १२ तास सुरू ठेवली जात आहे. दुसरीकडे चौकाचौकात वाहतूक पोलिस कारवाईसाठी थांबलेले दिसतात. मात्र, सिग्नलच्या ठिकाणी नेमलेल्या वाहतूक अंमलदारांकडून झेब्रा क्रॉसिंगवर थांबलेल्या वाहनांवर कारवाई केली जात नाही, असे दिसून येते. त्यामुळे त्यावर उभारले तरी चालते, असा अनेकांचा समज झाला आहे. सिग्नलजवळील झेब्रा क्रॉसिंग, स्पीड ब्रेकरवर थांबून पादचाऱ्यांची वाट अडविणाऱ्या वाहनास ५०० रुपयांचा दंड होतो. मात्र, सध्या हा नियम माफ करण्यात आला की काय, अशी सिग्नलवरील स्थिती आहे. दुसरीकडे सिग्नल अरुंद असल्याने तेथून जड वाहने जाताना त्यांची पंचाईत होत असल्याची स्थिती आहे.

## वि. गं. दामोदरे यांचे निधन

**पंढरपूर :** पंढरपूर एज्युकेशन



सोसायटीच्या अध्यापक विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य, कवठेकर व द.ह. कवठेकर प्रशालेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक तंत्र विभागाचे लेखनिक श्री. चिंतामणी दामोदर सर यांचे वडील विष्णुपंत गंगाधर दामोदरे उर्फ वि. गं.दामोदर सर यांचे वयाच्या 92 व्या वर्षी वृद्धापकाळाने नुकतेच दुःखद निधन झाले.

### तीर्थक्षेत्र पंढरपूर अमली पदार्थाच्या विळख्यात

# तरुणाई व्यसनाधीन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे पंढरपूर शहरात मोठी आर्थिक उलाढाल होते. यातूनच अनेक तरुण व्यसनाच्या आहारी गेले असल्याचे दिसून येत आहे. पंढरपूर अंमली पदार्थांची विक्री होत असल्याचे आढळून आले आहे. शहर पोलिसांनी एका वाहनातून 2 लाख 50 हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. यामुळे अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाला दररोज 50 हजाराहून अधिक भाविक येतात. आलेले भाविक विविध वस्तू खरेदी करतात. यामुळे पंढरपुरात अनेक छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांनी व्यवसाय सुरू केला आहे. त्यांचा व्यवसाय चांगला चालत असून दिवसाला हजारो रुपयांची उलाढाल होत आहे. सहज पैसा मिळत असल्यामुळे अनेक तरुण व्यसनाच्या आहारी गेले आहेत. पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणावर अवैध व्यवसाय सुरू आहेत. मात्र याकडे पोलिसांचे दुर्लक्ष असल्यामुळे व्यवसाय करणाऱ्यांचे मनोधैर्य वाढले आहे. यातूनच अंमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे आढळून आले आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना डी मार्ट जवळ असलेल्या रस्त्यावर रात्री एमएच 7 एस 3699 ही ईरटीका कार उभी असल्याचे दिसून आले. यामुळे पोलिसांना संशय आला. पोलीस कारजवळ जात असताना ती भरधाव वेगाने जाऊ लागली. यामुळे पोलिसांनी पाठलाग करून कार पकडली. कारची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये बारा खोके असल्याचे दिसून आले. या खोक्यात काय आहे? याची पाहणी केली असता त्यामध्ये गांजा असल्याचे दिसून आले. पोलिसांनी 12 खोक्यामध्ये असलेला बारा किलो गांजा किंमत 2 लाख 50 हजार रुपये व ईरटीका कार 8 लाख रुपये असा 10 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी कारचालक व कारमध्ये असलेला आणखी एक तरुण रोहन चव्हाण, रोहित कांबळे (रा. बावडा तालुका इंदापूर) या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश गोसावी, कदमश हेंबाडे, गोडसे, मंडले, माने, बिचुकले यांनी केली .

पंढरपुरात अमली पदार्थाची विक्री सुरू असल्यामुळे अनेक तरुण व्यसनाधीन झाले आहेत. व्यसनासाठी काही तरुणांनी कर्जे काढली आहेत. यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बिघडली आहे. यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना त्रास सहन करावा लागत आहे. तरी पोलिसांनी पंढरपूर शहरात सुरू असलेले अवैध व्यवसाय व अंमली पदार्थ विक्री यावर करडी नजर ठेवून कारवाई करावी अशी मागणी होत आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे » पान ३ वर

## काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाच्या शर्यतीत हसापुरे, म्हेत्रे, पाटील नावाची चर्चा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमुळे सर्वच पक्षाने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. सोलापूर जिल्ह्यात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पद रिक्त असल्याने हे पद भरण्यासाठी पक्षाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. या पदावर वर्णी लागावी म्हणून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सुरेश हसापुरे, प्रकाश पाटील यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र गेल्या दहा वर्षापासून जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली आहे. मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गट एकत्र येऊन महाविकास आघाडी स्थापन केली. या माध्यमातून त्यांनी लोकसभा व वि--धानसभा निवडणूक लढविल्या. लोकसभा निवडणुकीत सोलापूर व माढा लोकसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी झाले. महाविकास आघाडीमध्ये तीन पक्ष सामील असल्यामुळे जिल्ह्यात महाविकास आघाडीची ताकद वाढली असल्याचे दिसून येत आहे. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष » पान ३ वर

## ज्यूस मध्ये रसायनाचा वापर; नागरिकांच्या आरोग्यास धोका


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** उन्हाळा सुरू झाला असून उकाड्यापासून दिलासा मिळविण्यासाठी नागरिक ज्यूस सेंटरवर जाऊन विविध फळांचा रस पितात. मात्र या रसामध्ये रासायनिक द्रव्यांचा वापर केला जात असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. मात्र ज्यूस सेंटर कडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.



विविध प्रकारच्या फळांचा ज्यूस पिणे आरोग्यास चांगले असते. यामुळे डॉक्टर नागरिकांना ज्यूस पिण्याचा सल्ला देतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात चौका चौकात आंबा, अननस, सफरचंद, चिकूचा ज्यूस विक्री करणारे हातगडे लागले आहेत. या हातगाड्यांवर फळांचा ज्यूस म्हणून रासायनिक द्रव्याचा वापर केलेला ज्यूस दिला जात आहे. हातगाड्यावर नागरिकांना दाखविण्यासाठी फळे ठेवण्यात आलेली असतात. मात्र प्रत्यक्षात या फळांचा ज्यूस न देता रासायनिक द्रव्य असलेला ज्यूस दिला जात आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तरी अन्न व औषध प्रशासनाने पंढरपूर शहरातील ज्यूस सेंटरची तपासणी करून कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

उन्हाळ्यात बर्फास चांगले मागणी असते. मात्र दूषित पाण्यापासून तयार करण्यात आलेला बर्फ विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. या बर्फाचे सेवन करणे आरोग्यास अपायकारक आहे. मात्र बाजारात चांगल्या प्रकारचा बर्फ मिळत नसल्याने व्यापारी दूषित बर्फाचा वापर करत असल्याचे दिसून येत आहे.



### पीएम किसानचे 2 हजार रुपये 24 तारखेला मिळणार

**सोलापूर :** पीएम किसान योजनेच्या 19 व्या हप्त्याचे पैसे कधी मिळणार? याची ताजी अपडेट समोर आली आहे. 'माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या 19 व्या हप्त्याचे हस्तांतरण 24 फेब्रुवारी 2025 रोजी बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातून केले जाईल. याअंतर्गत, 9.7 कोटी शेतकऱ्यांना 21,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम दिली जाईल', अशी माहिती कृषी मंत्रालयाने दिली आहे. त्यामुळे या दिवशी 2 हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहेत.

## सौ.नलिनी गांधी यांचे सल्लेखना व्रताची समाप्ती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहरातील रत्नत्रय



परिवारातील सौ.नलिनी नवीनचंद्र गांधी यांनी जैन सांप्रदायिक पद्धतीने ६ दिवसापूर्वी सल्लेखना व्रताची दिक्षा घेतली होती. आज पहाटे चार वाजता समाधीच्या रुपात सलेखना व्रताची सांगता झाल्याने सौ. नलिनी गांधी यांचे समाधीव्रत अध्यात्मिकदृष्ट्या यशस्वी झाल्याचे दिसून येते.

वयाच्या ८८ व्या वर्षी अत्यंत धार्मिकवृत्तीच्या सौ.नलिनी यांची प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांची वृत्ती अत्यंत धार्मिक असल्याने त्यांनी कुटुंबियांना सल्लेखना व्रत घेण्याची माझी अंतरिक इच्छा आहे असे सांगतानाच त्यांना कुटुंबात पुन्हा आणून शास्त्रोक्त पद्धतीने संल्लेखना व्रताची दिक्षा घेतल्यानंतर अन्न, पाणी पूर्णपणे बंद करुन अत्यंत निष्ठेनी त्यांनी सल्लेखना व्रताची सांगता केली. अत्यंत धार्मिक वृत्तीच्या सौ. नलिनी यांनी जैन सांप्रदायिक अनेक व्रत वैकल्ये आपल्या जीवनात शास्त्रोक्त पद्धतीने आणून धार्मिक उपासनेची अत्यंतिक निष्ठा पणाला लावली होती. आज पहाटे चार वाजता समाधी अवस्था त्यांना प्राप्त झाल्याने त्यांच्यावर विधीवत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जैन समाजातील अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## परीक्षा केंद्राच्या परिसरात विविध इलेक्ट्रीक उपकरणे वापरण्यास बंदी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे मार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील विविध केंद्रावर आयोजित करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी परीक्षा कालावधीत केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 लागू करण्यात आले आहे.

इयत्ता 12 वी ची परीक्षा दि.11 फेब्रुवारी ते 18 मार्च दरम्यान घेण्यात येत आहे. परीक्षांचे संचालन सुयोग्य प्रकारे व्हावे यासाठी परीक्षा कालावधीत सकाळी 9 ते सायंकाळी 6 या वेळात पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील सर्व परीक्षा केंद्राच्या 100 मीटरच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहे. पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील सर्व परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे. परीक्षा केंद्राच्या परिसरात सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करणे. परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरातील झेरॉक्स, फॅक्स सेंटर, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे अशा दळणवळण सुविधा आणि पानपट्टी कार्यरत ठेवणे. परीक्षा केंद्राचे परिसरात मोबाईल फोन, टॅबलेट, इलेक्ट्रॉनिक घड्याळ, सेल्युलर फोन, वायरलेस सेट, ट्रान्झीटर व इतर माध्यमासह प्रवेश करणे, परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात कोणत्याही वाहनांस प्रवेश करणे. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती (उमेदवारांचे नातेवाईकासह) परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात प्रवेश करणे. » पान ३ वर

### लाडकी बहिण योजना; फेब्रुवारीचा हप्ता येत्या आठवड्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सध्या लाडकी बहिण



योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता कधी मिळणार? याकडे तमाम पात्र महिलांचं लक्ष लागलं आहे. त्यातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोठी माहिती दिली आहे. "महिलांचे प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. लाडकी बहिण योजनेवरून आमच्यावर टीका केली जात आहे. ही योजना बंद होणार असे सांगितले जात आहे. पण येत्या आठवड्यात लाडक्या बहिणींना पैसे मिळणार आहेत", असं अजित पवारांनी म्हटलं आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. लवकरच पैसे खात्यात जमा होणार आहेत.

## सत्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**पंढरपूर :** वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. दयानंद गावडे यांचे वडील श्री. सदाशिव उर्फ बापूसाहेब गावडे यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त शुभचिंतक कॉन्ट्रॅक्टर आर.बी. जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. गुरवरे ता. फलटण एका भव्य कार्यक्रमात व अध्यात्मिक वातवरणात हा वाढदिवस संपन्न झाला.

### जिल्ह्यावर येणार पाणी टंचाईचे संकट

# जिल्ह्यात जलयुक्त शिवाराची कामे संथ गतीने

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पिकांना व पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी शासनाने जलयुक्त शिवार योजना सुरू केली आहे. या अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात 202 कामांना मंजुरी देण्यात आली आहे. मात्र 18 कामे पूर्ण झाली आहेत. अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. यामुळे शेतकरी व नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे . सन 2014 साली राज्यात म्हणावा तसा पाऊस पडला नाही. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. यामुळे पिकांना पाणी मिळाले नाही. पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण भटकावे लागले. याची दखल घेऊन शासनाने पावसाचे पडणारे पाणी साठवून ठेवण्यासाठी जलयुक्त शिवार योजना सुरू केली. यासाठी निधी देण्यास सुरुवात करण्यात आली. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेततळी तयार करणे, नाल्याचे खोलीकरण, नवीन नाले बांधणे, जुने ब्रिटिश कालीन, शिवकालीन विहिरी, तलाव याची स्वच्छता करून पुन्हा उपयोग करणे, पाझर तलाव बांधणे, दुरुस्ती करणे, पाण्याचे जुने स्तोत्र पुन्हा उपयोगात आणणे या कामांना सुरुवात करण्यात आली. सोलापूर जिल्ह्यात यंदाच्या वर्षी 202 कामांना मंजुरी देण्यात आली. यासाठी 14 कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला. या योजनेअंतर्गत 18 कामे पूर्ण झाली आहेत. 83 कामांना सुरुवात करण्यात आली आहे.तर 114 कामे विविध कारणाने बंद आहेत. जलयुक्त शिवारची कामे संथ गतीने सुरू असल्याने ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे. उन्हाळ्यात शेतीला पाणी व पिण्यासाठी पाणी मिळण्यास अडचण निर्माण होणार आहे.



## आ. देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** श्री शिवजन्मोत्सव



मध्यवर्ती महामंडळ सोलापूरच्यावतीने शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहन सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, राजन जाधव, दिलीप कोल्हे, श्रीकांत डांगे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, कार्याध्यक्ष पंकज काटकर, श्रीकांत घाडगे, जगदीश पाटील, सुभाष पवार, सुनील शेळके आदी उपस्थित होते.

## माधवानंद शिवजन्मोत्सव समितीव्दारे शिवाजी महाराज जन्मोत्सवाचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर येथील माधवानंद शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवरायांची शौर्यगाथा, शेअर शिवराज मराठी चित्रपट प्रदर्शन, चित्रकला, निंबंध, वक्तृत्व स्पर्धा वगैरे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाचा प्रारंभ डॉ. अर्जुन भोसले उपविभागीय पोलिस अधिकारी व डॉ. महेश सुडके वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय,पंढरपूर यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाला डॉ. विलासराव डोईफोडे व डॉ. बी.पी. रोंगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भव्य दिव्य कार्यक्रमाचा आस्वाद पंढरपूर व परिसरातील लोकांनी घ्यावा असे आवाहन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय धोत्रे व डॉ. विश्वासराव मोरे ( मार्गदर्शक) यांनी केले आहे. सदरचे कार्यक्रम गाताडे प्लॉट येथे आयोजित करण्यात आले आहेत.



**सोलापूर** : सोलापूर येथील बीसीसीआयचे अंपायर अनिश सहस्त्रबुद्धे यांची टाटा महिला प्रीमिअर लीग स्पर्धेसाठी ऑन फिल्ड पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. ते विविध सामन्यांमध्ये मैदानावर पंचाची भूमिका पार पाडताना दिसणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

### नगरपंचायतीकडून प्रशासकीय बैठकीचे आयोजन

# नातेपुते नगरपंचायतीकडून नागरिकांचा विश्वासघात का? - पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : नातेपुते नगरपंचायतीने लागू केलेला शहर विकास आराखडा वादाच्या भोवऱ्यात असताना नगरपंचायतीकडून प्रशासकीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी आपल्या समस्या अतिशय तीव्र स्वरूपात मांडल्या.

मुख्याधिकारी खांडेकर साहेब यांनी प्रशासकीय भूमिका सांगितली असता त्यामध्ये त्यांनी सांगितल की, रस्त्यासाठी जे आरक्षण पडले त्यासाठी कोणतीही आर्थिक भरपाई मिळणार नाही. त्याचबरोबर जे भूखंड आरक्षित केलेले आहेत ते नगरपंचायतीने स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी करावयाचे आहेत.

नगरपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे का? नागरिकांच्या हरकतीच्या अनुषंगाने नगरपंचायतीमध्ये ०३ जानेवारी २०२५ रोजी विषय क्रमांक ५ अन्वये आरक्षण रद्द करण्याचा ठराव करण्यात आला. त्या ठरावामध्ये मुख्याधिकारी खांडेकर साहेब हे सांगतात की, हा ठराव बेकायदेशीर आहे, हा ठराव महाराष्ट्र न. प. अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये रद्द होऊ शकतो तशी कायद्यामध्ये कोणतीही तरतूद नाही. हा ठराव करून प्रशासनाला काय सिद्ध करायच आहे? म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल की, घटनेत एखादे कलम वाईट आहे, पण ते जर चांगल्या लोकांच्या हाती पडले तर त्याचे रिझल्ट चांगले येतील. परंतु याउलट घटनेत एखादे कलम वाईट आहे, जर चांगल्या लोकांच्या हातात पडले तर त्याचे रिझल्ट सुद्धा चांगले येतील.

वास्तविक पाहता नगरपंचायतीने महाराष्ट्र नगरपंचायत नगर विकास नगर रचना २८ च्या पोट-नियम (४) या कायद्यान्वये सुधारणा करणे, बदल करणे, राजपत्रित करणे अपेक्षित होत.

पुणे-पंढरपूर रस्ता सध्याचा १०० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. दहिगाव रोड सध्याचा ६० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. पिरळे रोड सध्याचा २५ फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे. पालखी तळाच्या पूर्वेला माऊली मंदिर रोड १० फुटाचा अस्तित्वात आहे, तो तेवढाच ठेवणे, कारण नातेपुते नगरपंचायत अंतर्गत येणारी अखंड बाजारपेठ व नागरीवस्ती उध्वस्त होत असल्याने हा बदल करणे अपेक्षित आहे.

रस्त्यामुळे नागरिकांची घरे, दवाखाने आदी पडझड होत असल्यामुळे अशा ठिकाणचे रस्ते करून कोणाची घरे उध्वस्त होणार नाहीत याची दखल घ्यावी. उमाजी नाईक नगरमध्ये औद्योगिक वसाहत म्हणून टाकलेला झोन रद्द करून निवासी करणे, कत्तलखाने मटन मार्केट रद्द करणे, नवीन विकसित केलेल्या भागांमध्ये रस्ते मोठे करणे किंवा ते आहे तेवढेच ठेवणे, कारण नवीन कलेक्टर एन.ए. असल्याने त्यांना अपेक्षित असणारे रस्ते आरक्षण सदर जागा मालकांनी सोडलेले आहेतच. त्याचबरोबर नगरपंचायत जेवढे भूखंड खरेदी करू शकते तेवढेच खरेदी करणे किंवा बदलणे अगोदर आरक्षण शासकीय जमिनीवर टाकणे, भूखंड ठरवताना नागरिकांना विश्वासात घेऊन नातेपुते प्रादेशिक योजना हद्द वाढ करून वाढवणे. कलम २८(४) च्या नियमानुसार नियोजन समिती गठीत करून वर सुनावणी घेऊन कलम २८ (४) व कलम ३० नुसार प्रारूप विकास योजनेतील अपेक्षित बदलानुसार शासनाच्या मंजूरीसाठी पाठवणे अपेक्षित आहे.

०३/०२/२०२५ च्या केलेल्या ठरावामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे कदाचित व्यापारी, प्लॉट धारक, खरेदी करणारे, खरीददार, आसपासच्या पंचक्रोशीतून राहण्यासाठी पसंती देणारे नागरिक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण होऊन ते वेगळ्या ठिकाणी जाऊन राहू शकतात. पर्यायांमध्ये बारामती, अकलूज, फलटण या शहरांमध्ये राहण्यास अथवा व्यापार करण्यासाठी जातील असे झाल्यास नातेपुते बाजारपेठेची घोडदौड मंदावणार आहे. यासाठी सकारात्मक प्रयत्नाची गरज आहे. राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री मा.श्री.एकनाथराव शिंदे साहेब, यांच्याकडे शिवसेनेच्या वतीने जनतेच्या बाजूने सकारात्मक भूमिका घेण्यासाठी शिवसेना कटिबद्ध आहे. असे शिवसेना नेते राजकुमार हिवरकर-पाटील यांनी यावेळी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## महुदच्या ६० महिलांची फसवणूक; पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला** : आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून पती-पत्नीने मिळून बचतगटाच्या नावाखाली महिलेकडून प्रती महिना ३०० रुपये बचत घेऊन त्यापोटी पाच वर्षांनी मुद्दल व्याजाचा परतावा न देता महिलेची सुमारे ७२ हजार रुपयांची तसेच त्यांच्या प्रमाणे गावातील सुमारे ६० महिलांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी, जयश्री बिरा लवटे (रा. महूद) यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी शाहीर करीम मुलाणी व यास्मिन शाहीर मुलानी दोघेही (रा. महूद, ता. सांगोला) पती-पत्नी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

» Selected

## अशासकीय लिपिक टंकलेखक पदासाठी भरती

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद मेस्को मार्फत भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह आपले अर्ज गुरुवार दिनांक 20 फेब्रुवारी 2025 पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. या पदासाठी जिल्ह्यातील माजी सैनिक तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्या रोजगार पटावर नोंद असलेल्या युध्द विधवा, सैनिकांच्या विधवा पत्नी यांना प्राधान्य देण्यात येईल.


## आ. देशमुख यांची स्वच्छता मोहिमेला भेट



**सोलापूर** : सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरांमध्ये दररोज विविध भागांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचे शहरवासीयांकडून कौतुक होत आहे. दरम्यान सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी या सुरू असलेल्या स्वच्छता मोहीमेची प्रत्यक्ष त्या - त्या ठिकाणी भेट देऊन स्वच्छतेचे पाहणी केली. यावेळी आमदार देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी नवता वीर हिची निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**करमाळा** : शेलगाव क. ता. करमाळा येथील रहिवाशी व सध्या जुन्नर, जिल्हा पुणे येथे कार्यरत असलेले, प्रा. इंद्रजीत वीर यांची कन्या कुमारी नवता इंद्रजित वीर हिची १०० मी. धावणे या खेळ प्रकारासाठी, महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशीप २०२५ या पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स असोसिएशन च्या वतीने करण्यात आलेल्या, जिल्हास्तरीय सब ज्युनिअर खेळ गटामध्ये ८ वर्षांखालील मुलींच्या गटातून १०० मी. धावणे या खेळ प्रकारात नवता हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला होता.

## व्यापाऱ्याला ८ लाखाची खंडणी मागणाऱ्या ५ जणांवर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बार्शी** : बार्शी येथील व्यापारी पवन श्रीश्रीमाळ यांना घरात जाऊन ८ कोटी रुपयांची खंडणी मागितली. खंडणी न दिल्यास अपहरण करून ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल दाखल झाला आहे. त्यातील तिघांना अटक केली आहे.

याबाबत व्यापारी पवन संजय श्रीश्रीमाळ (रा. बालाजी कॉलनी, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. याप्रकरणी आकाश कानू बरडे (वय १९, रा. परांडा रोड, बार्शी), अजिंक्य टोणपे (रा. भोसे चाकण, पुणे), दक्ष पांडे (रा. मोरे वस्ती, साने चौक, पुणे) यांच्यासह पाच जणांविरुद्ध बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपास अधिकारी पोसई उमाकांत कुंजीर तपास करताना आकाश बरडे या आरोपीला अटक करून त्याला बार्शी न्यायालयात न्यायाधीश राऊत यांच्यासमोर उभे केले. त्याला १७ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे तर यातील अजिंक्य टोनपे व दक्ष पांडे हे दोघे पळून गेले आहेत. अन्य दोघे विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याने त्यांना सोलापूर बालन्यायालयात हजर करण्यात आले.

## आभार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर** : सोलापूर महानगरपलिकेच्या आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या धोरणात्मक निर्णयामुळे परिवहन उपक्रमाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्ती वर्ष ज्येष्ठतेच्या आधारे प्रोव्हिडेंट फंडाची थकीत रक्कम एकवट देण्याचे जाहीर करण्यात आले होते. या वितरणामुळे परिवहन उपक्रमाचे मयत सेवक कै. दावल कबाडे यांची पत्नी मंगल दावल कबाडे यांना त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या 2 दिवसापूर्वी थकीत रक्कम रुपये 2, 17, 861/- एक रक्कमी मिळाल्याने त्यांनी आयुक्तांची भेट घेऊन पुष्पगुछ देऊन त्यांचे आभार मानले.

## शिवजयंती मिरवणुकीनिमित्त वाहतूक मार्गात बदल



**सोलापूर** : सोलापूर शहरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त 18 फेब्रुवारी रात्री आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात पाळणा कार्यक्रम व 19 रोजी मिरवणूक काढण्यात येणार आहे. अपघात व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या आदेशावरून शहरातील विविध रस्त्यांवरील वाहतुकीच्या मार्गावर बदल केला आहे. शिंदे चौक ते नवी पेठ, मेकॅनिकी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाळीवेस, मधला मारुती, जुने विठ्ठल मंदिर चौपाड हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

## जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांचा दिव्यांग शाळा कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार



**सोलापूर** : जिल्हा समाज कल्याण अधिकारी पदावर प्रतिनियुक्ती झालेल्या सुलोचना सोनवणे यांचा सोलापूर जिल्हा अपंग शाळा कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.त्याप्रसंगी चेअरमन विठ्ठल सातपुते,व्हाईस चेअरमन अशोक उमाप, शशिकांत ढेकळे, सुधीर खांडेकर आदी.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : प्रभारी जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांचा सोलापूर जिल्हा अपंग शाळा कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने गुरुवारी सत्कार करण्यात आला. पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल सातपुते, व्हाईस चेअरमन अशोक उमाप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग कल्याण विभागाचे प्रभारी वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता शशिकांत ढेकळे,पतसंस्थेचे सचिव नागेश बिराजदार, सुधीर खांडेकर, धनंजय काळे,पोपट घोडके यावेळी उपस्थित होते. दिव्यांग शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या अर्थिक समस्या सोडविण्यासाठी त्यांना कर्जरुपात हातभार लागावा, या उद्देशाने या पतसंस्थेची स्थापना करण्यात आली असल्याचे यावेळी चेअरमन सातपुते यांनी सांगितले.

## तेलुगू मुन्नूरवार ज्ञात गंगा व युवक संघटनेच्यावतीने हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर** : तेलुगू मुन्नूरवार ज्ञात गंगा व युवक संघटना यांच्या वतीने आयोजित हळदी कुंकू समारंभाचे आयोजन तसेच समाजातील कर्तृत्ववान महिलांच्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

तेलगू मुन्नूरवार ज्ञात गंगा व युवक संघटनेच्या वतीने सामाजिक उपक्रमांच आयोजन करण्यात येते. नुकतेच संघटनेच्या वतीने सात रास्ता येथील ईरण्णा उपलप मंगल कार्यालयात ज्ञातीतील महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सुशील उपलप, उपाध्यक्ष सुरेश चितारी, सचिव द्वारकाप्रसाद उपलप यांच्यासह पदाधिकारी, सदस्य आणि महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी तेलगू मुन्नूरवार ज्ञात गंगा व युवक संघटनेच्या कार्याचं उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी ज्या महिलांचा सत्कार करण्यात आला त्या महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तेलगू मुन्नूरवार ज्ञात संस्था व युवक संघटनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय लोक अदालतीचे 22 मार्चला आयोजन




**सोलापूर** : राज्य विधी सेवा प्राधिकरण, यांचे निर्देशानुसार सन 2025 सालातील पहिले राष्ट्रीय लोकअदालत दि. 22 मार्च 2025 रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे. या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, अपघात न्यायालयाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भूसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्ती, नॅक लवाद दरखास्ती इत्यादी प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.




### आप्पासाहेब देशमुख यांनी केलेल्या कामाची दखल

# डॉ. आप्पासाहेब देशमुख यांचे भाजपाचे बावनकुळे यांच्याकडून अभिनंदन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : माळशिरस तालुक्यातील भाजपाचे कट्टर समर्थक "ना विकनारा" "ना झुकनारा "पक्षासाठी प्रामाणिक काम करुन माळशिरस तालुक्याचे धुरंदर नेतृत्व असणारे कुठल्याही प्रकारे आशा आकांक्षा न ठेवता घरावर तुळशीपत्र ठेवून पक्षासाठी जीवाचं रान करणारा भाजपच्या या कार्यकर्त्याला भाजपाचें चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉक्टर अप्पासाहेब देशमुख यांचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून अभिनंदन.

कार्याचे कौतुक करून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉक्टर आप्पासाहेब देशमुख यांचे पत्र पाठवून अभिनंदन केले आहे.

सदरच्या पत्रामध्ये, भारतीय जनता पार्टीच्या संघटनपर्वामध्ये आपण १००० सदस्य नोंदणी करून त्यांना भारत देशाच्या पुनर्निर्माणाच्या प्रवासात सहभागी करून घेतल्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन ! भाजपाचे अंत्योदयाचे धोरण आपण जनमानसात घेऊन जात आहोत.

यातून आपली लोकांप्रती असलेली बांधिलकी आणि पक्ष विचारांप्रती असलेली निष्ठा अधोरेखित होते. आपल्या या समर्पित योगदानाबद्दल पक्षाध्यक्ष म्हणून मला आदर आणि अभिमान वाटतो.

आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची मान जगभरात उंचावली आहे, तर आपले आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र थांबणार नाही, याची सर्वांना खात्री आहे.

संघटनपर्वात किमान एक हजार सदस्य भाजपा सोबत जोडून आपण संघटना बळकट केलीच आहे, शिवाय महाराष्ट्राच्या विकासासाठीचे दूतही आपण जोडून घेतलेले आहेत.

त्यांच्या अभिनंदन मुळे माळशिरस तालुक्यातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना मिठाई भरवून अभिनंदन केले.

**सांगोला :** गावातील अवैधरीत्या दारू विक्री, जुगार, मटका बंद करावेत म्हणून ग्रामसभेत एकमताने ठराव मंजूर केल्याचा राग मनात धरून गावातील अवैध व्यावसायिकांनी चक्क पोलिसांसमोर सरपंचांना हातपाय तोडून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी वाकी (ता. सांगोला) ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल शिवाजी हंबीरराव यांनी अजित बुचडे, नीलेश होवाळ, सुनील चव्हाण, सागर हेगडे व सुंदर काटे यांच्या विरुद्ध पोलिस स्टेशनला तक्रारी अर्ज दिला आहे.

## सनराईज परिवाराच्या वतीने

# राज्यसेवा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचा सत्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** सनराईज पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज शेळवे येथे mpsc मार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होऊन विविध पोस्ट मिळवणाऱ्या यशवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला,त्यामध्ये गादेगाव ची सुकन्या कु.प्रतीक्षा दत्तात्रय बागल हिची मंत्रालय महसूल सहाय्यक पदी निवड झालेबद्दल,तर पिराची कुरोली चे सुपुत्र चि.सनम अर्जुन लामकाने यांची समाजकल्याण सहाय्यक पदी निवड झाल्याने,तसेच शेळवे गावचे सुपुत्र ची.स्वामी बिभीषण आसबे यांची अतिशय हालाकीच्या परिस्थितीतून टॅक्स असिस्टंट व महसूल सहाय्यक पदी निवड झालेबद्दल सन्मान करण्यात आला.

सर्व यशस्वी अधिकाऱ्यांचा व त्यांच्या सोबत खंबीरपणे उभा राहणाऱ्या आई-वडिलांचा प्रशालेच्या वतीने यथोचित सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या.

स्वामी आसबे यांनी आपल्या मनोगतातून शेळवे येथील सणराईज प्रशाला विध्यार्थी घडवण्यासाठी नियमित धडपड करत असते,प्रशालेचे स्पर्धापरीक्षा मधील योगदानामुळे मागील दहा वर्षात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा अधिकारी होण्याचा टक्का वाढला त्यामुळेच सणराईज पॅटर्न नावारूपास येत असल्याचे त्यांनी सांगितले, हेच प्रशालेचे वैशिष्ट्य आहे, तर सनम लामकाने यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेऊन स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकाजवळ आणण्यासाठी प्रशालेचे जे प्रयत्न चालू आहेत ते कौतुकास्पद असल्याचे सांगितले, कु. प्रतिक्षा बागल यांनी आपल्या मनोगतातून,कठीण परिश्रम, जिद्द, त्याग हिच यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रसंगी शेळवे गावचे जेष्ठ नागरिक विठ्ठल मारुती गाजरे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब (बापू) गाजरे,पिराची कुरोली चे ग्रामपंचायत सदस्य अनिल लामकाने, आबासो लामकाने, शंकर खपाले, संतोष गाजरे, समाधान भैय्या गाजरे, बाबासाहेब पवार, बळीराजा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा प्रकाश गाजरे, गादेगाव चे सामाजिक चळवळीतील नेते व प्रतिक्षा बागल हिचे वडील दत्ताभाऊ बागल,शेळवे येथील जेष्ठ नागरिक चि.स्वामी यांचे पालक बिभीषण व सौ. सीताबाई आसबे ईत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष समाधान गाजरे यांनी केले तर आभार संस्थापक सचिव अंकुश गाजरे यांनी मानले, कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी संस्थेचे संस्थापक उपाध्यक्ष अजित लोकरे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन गायकवाड यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपक्रमशील शिक्षक रामचंद्र मोकळे, संगीत व कला शिक्षक योगेश गायकवाड,प्रशालेचे अकाउंटंट कबीर शेख तसेच सर्व अध्यापक वृंद, कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## शिंदे कारखान्याकडून प्रतिटन २८०० रुपये जमा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** विठ्ठलराव शिंदे कारखान्याच्या युनिट नंबर १ पिंपळनेर व युनिट नंबर २ करकंब कारखान्याचे २१ ते ३१ जानेवारीअखेर प्रतिटन २८०० रुपयांप्रमाणे ऊसबिले शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असून, १५ जानेवारीअखेर ऊस तोडणी वाहतूक बिले अदा करण्यात आली असल्याची माहिती साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे यांनी दिली. ऊस बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले असल्याचे अनेक शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले. पुढील हप्ताही लवकरच जमा होणार असल्याचे सांगण्यात आले.

» पान १ वरुन

## तीर्थक्षेत्र पंढरपूर अमली पदार्थाच्या...

विठ्ठलाच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी. असे आदेश शासनाने दिले आहेत. मात्र अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तरुणांकडून भाविकांना त्रास दिला जात आहे. यामुळे भाविकातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाच्या शर्यतीत...

धवलसिंह मोहिते पाटील यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. यामुळे गेल्या दोन ते तीन महिन्यापासून जिल्हाध्यक्ष पद रिक्त आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. यामुळे प्रत्येक पक्षाने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर काँग्रेसने मोर्चे बांधणी सुरू केली आहे. जिल्ह्यात काँग्रेसची ताकद वाढण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहे. जिल्हाध्यक्ष पद रिक्त असल्याने हे पद भरण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. जिल्हाध्यक्ष पदासाठी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सुरेश हसापुरे, प्रकाश पाटील यांची नावे चर्चेत आहेत. मात्र अंतिम निर्णय प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ घेणार आहेत.

## परीक्षा केंद्राच्या परिसरात विविध....

परिक्षे केंद्रापासुन 100 मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

सदरचा आदेश परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत सर्व शासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, परीक्षार्थी, पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांना त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाही. हा आदेश दिनांक 11 फेब्रुवारी 2025 ते दि 18 मार्च 2025 या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी 09.00 वा. ते सायं.6 00 वा. पर्यंत सर्व परीक्षा केंद्राच्या 100 मीटर परीसरात लागू राहील

या आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, ती व्यक्ती भारतीय न्याय संहिता, 2023 चे कलम 223 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल. असे आदेश पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) सोलापूर अजित बोऱ्हाडे यांनी दिले आहेत.

## वायकुळे यांचे तृतीयपंथीय समुदायासाठी उल्लेखनीय कार्य



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी शहर व परिसरातील तृतीयपंथीय समुदायासाठी उल्लेखनीय सामाजिक कार्य करणारे सचिन मदनराव वायकुळे यांना आमदार अॅड. दिलीप सोपल यांनी विशेष पत्राद्वारे मनःपूर्वक शुभेच्छा व कौतुक केले आहे. तृतीयपंथीय समाज हा अनेक वर्षांपासून विविध मूलभूत हक्कांपासून वंचित राहिला आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना स्थान मिळावे, त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात, यासाठी सचिन वायकुळे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. परिसरातील तृतीयपंथीय व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठा पुढाकार घेतला आहे.

## उपाययोजना करा

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिलाटी रेल्वे स्टेशन ते होटगी स्टेशन दरम्यान असलेले सिमेंट फॅक्टरीचे चारही रेल्वे फाटक लवकरात लवकर बंद करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नागरिकांचा अंत पाहू नका, तात्काळ पर्यायी उपाययोजना शोधून ब्रिज व उड्डाणपूल बांधण्यासाठी कार्यवाही करण्याचेही आदेश ही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. आज शुक्रवारी, आमदार सुभाष देशमुख यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे प्रशासन आणि सिमेंट कंपन्यांची बैठक घेतली.

Selected


## बांगलादेशी घुसखोरांना हाकलून लावा



**सोलापूर :** शासनाने राज्यभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, तसेच या घुसखोरांना साहाय्य करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने तहसीलदार संतोष कणसे यांच्याकडे केली. यावेळी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने डॉ. मानस कमलापूरकर, विकास गावडे, रुद्रेश स्वामी, श्रेयस तोडकरी, भीमाराम चौधरी, निरंजन नवाळे, बिराजी आगलावे, गोपाळ माने उपस्थित होते. बनावट ओळखपत्रे तयार करणाऱ्या रॅकेटची पाळेमुळे उखडून त्यावर कठोर कारवाई करावी.

## भाळवणीतील शिलधन भोसले यांची मंत्रालय सहाय्यक पदी निवड

■ *पंढरी संचार न्यूज नेटवर्क*



*__पंढरपूर__ : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील शिलधन लक्ष्मण भोसले यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परिक्षेत मंत्रालय सहाय्यक पदी उज्वल यश संपादन केले आहे.*

*शिलधन भोसले यांचे प्राथमिक ते बारावी पर्यंतचे शिक्षण भाळवणी येथील जिल्हा परिषद व न्यू इंग्लिश स्कूल येथे झाले. नंतर कोल्हापूर येथील के.आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग हे पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. शिलधन याचे वडील लक्ष्मण भोसले सेवानिवृत्त बस वाहक कर्मचारी आहेत.*

*त्याच्या या निवडीबद्दल भोसले यांचे भाळवणी गावातील सर्व स्तरांमधून कौतुक केले जात आहे. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने येथील कार्यालयात सरपंच रणजीत जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच भीमज्योत तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळून मिरवणूक काढून आनंद व्यक्त केला. या यशाबद्दल भोसले यांचे कौतुक करून अभिनंदन केले जात आहे. यावेळी शिलधन भोसले म्हणाले की, विद्यार्थ्यांनि कोणत्याही प्रकारच्या परिक्षेत सहभागी झाले पाहिजे. सतत अभ्यास केला पाहिजे.यश नक्कीच मिळेल.*

*याप्रसंगी उपसरपंच नितीन शिंदे, दीपक गवळी, विजय शिंदे, शकील काझी, ग्रामपंचायत सदस्य प्रवीण गायकवाड, विशाल म्हेत्रे, अमोल लिंगे, सचिन भोसले, सद्दाम सय्यद, निहाल शेख, सौरभ तारळकर, विठ्ठल लोखंडे, अर्जुन माने, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.*

## बर्न केअर व ट्रॉमा केअर सेंटर उभारणीस गती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** आरोग्य सेवा आणखी मजबूत करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता आहे. शासकीय उपजिल्हा रुग्णालय, बार्शी येथे "बर्न केअर युनिट" व "ट्रॉमा केअर सेंटर" सुरू करण्याचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच, ग्रामीण रुग्णालय, पांगरी येथे ट्रॉमा केअर सेंटर मंजूर करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. प्रदेश सचिव शिरीष धनंजय ताटे यांनी या महत्त्वपूर्ण मागणीसाठी शासनाकडे जोरदार पाठपुरावा केला. यासंदर्भात राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी पत्र पाठवून यावर त्वरित कार्यवाही करण्याची शिफारस केली आहे.

## बोरामणी गवताळ सफारीचे लोकार्पण कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील बोरामणी येथे बोरामणी गवताळ सफारीचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लोकार्पण केले. माळरानावर असलेल्या या सफारीमुळे पर्यावरण संवर्धनाला चालना मिळणार असू पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात रमण्याची एक उत्तम संधी उपलब्ध झाली आहे. या गवताळ सफारीमुळे जैवविविधता जपली जाणार असून पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी मिळणार आहेत.

## मंदिर विकास आराखडा तयार करणे गरजेचे



**सोलापूर :** सोलापूर दक्षिण मधील पांडुरंग देवालय, मंद्रूप येथील ३५० वर्षांची परंपरा असलेल्या श्री विठ्ठल मंदिराच्या नव्या शिखराचे कळसारोहण विधीपूर्वक संपन्न झाले. मंदिर परिसरातील धार्मिक आणि मंगलमयी वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात आमदार सुभाष देशमुख हे सहभागी झाले. यावेळी आमदार देशमुख म्हणाले, सोलापूर जिल्ह्याला अध्यात्मिक शक्ती प्राप्त असून, जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी मंदिर विकास आराखडा तयार करणे आणि सातत्याने धार्मिक उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे.






## रोपळे येथील गावभेटी दौऱ्यात दिले आश्वासन...

# रोपळे भागातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावणार- पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** रोपळे ग्रामस्थांनी दिलेल्या मतदानाची उतराई विकास कामांच्या रूपात करणार असून या भागातील सिंचनाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे ठाम आश्वासन आमदार नारायण (आबा) पाटील यांनी दिले. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर आयोजित आभार गाव भेट दोऱ्यात रोपळे (ता. माढा) येथील आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. दास महाराज, पांडुरंग मेहर, मा. सरपंच दादासाहेब भांडवलकर (वरकुटे), उपसरपंच बप्पा जाधव (चोभे पिंपरी), सरपंच भाऊराव शिनगारे (बिटरगाव), उपसरपंच काकासाहेब नाडकर (लोणी), मा. सरपंच तात्यासाहेब गोडगे (रोपळे), युवानेते आनंद गोडगे, रामचंद्र वाघमारे, अतुल दास, शरद पाटील, राजेंद्र देवकर सर, अण्णासाहेब पवार, दगडू मेहेर, गोविंद काळे, कैलास गोडगे, संतोष पाटील, नाना दास, मेजर कुमार साळवे, वस्ताद कल्याण मेहेर, हनुमंत खताळ, शिवाजी गवळी, विष्णू फंड सर, दीपक पिसाळ, अजित गुंडगिरे, राजाभाऊ मेहेर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार नारायण (आबा) पाटील पुढे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत परिवर्तनची लढाई जिंकताना माढा तालुक्यातील छत्तीस गावांनी महत्वाची जबाबदारी पेलली. माढा तालुक्याच्या वेशीवर असलेल्या रोपळे गावाने दिलेली साथ मला आत्मविश्वास व बळ देणारी आहे. आगामी काळात या भागातील रस्ते, शेतीच्या पाण्याचे व विजेचे प्रश्न, आरोग्य तसेच शिक्षण व रोजगार हे प्रश्न सोडवण्यासाठी आपण अविरत प्रयत्न करणार असून विकास निधीतून या भागात महत्वाची कामे करण्यावर भर देणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. प्रस्तविक तात्यासाहेब गोडगे यांनी केले तर आभार आनंद गोडगे यांनी मानले.



पंढरी संचार

SUNDAY EDGE
पंढरी संचार pandharisanchar.com 16•FEB•2025

# पतधोरणाचे आयाम



**रिझर्व बँकेचे राष्ट्रीय पतधोरण जाहीर झाल्यानंतर या बँकांनी हळूच तुमच्या आमच्या सारख्यांच्या खिशामध्ये कसा हात घातला आहे हे या पतधोरणाचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर लक्षात येते बहुतेक माध्यमे मीडिया विश्लेषक हे सर्व घटक सध्या मोदीप्रेमी असल्यामुळे सर्वांनीच या पतधोरणाचे आणि ते आधी जाहीर केलेल्या अर्थकारणाचे भरपूर कौतुक केले परंतू एटीएममधून चारपेक्षा अधिक वेळेला पैसे जरी काढले तरी काही टक्के आपले रक्कम आता थेट आरबीआयला जमा होणार आहे यासारखे बारकावे कोणी देखील यामध्ये समोर आणले नाहीत.**



**गेल्या सप्ताह मध्ये अर्थकारणावर बरीच चर्चा झाली परंतु या चर्चेमध्ये अनेक गोष्टी भारताला नवीन उंचीवर घेऊन जाणारे असल्या तरी वैयक्तिक आयुष्यातील बँकिंग किती जबाबदारी करणे गरजेचे आहे याचे अनेक आयाम समोर आले आहेत त्याचे परीक्षण करणारा विशेष लेख .... !**

रेपोरेट बदलल्याने सामान्यजनांच्या कर्जावरील व्याजात किती बचत होईल याची चर्चा सुरु झाली. आणखी एक खास बातमी म्हणजे मोबाईल आयात करणारा आपला देश आता निर्यातदार बनतो आहे. या सर्व बातम्यांची तपशिलात माहिती घेण्याची गरज आहे.



**विश्लेषण**

**अनिरुद्ध बडवे**

**पंढरी संचार**

एटीएममधून पैसे काढणाऱ्या लोकांसाठी रिझर्व्ह बँक मोठा बदल करण्याच्या तयारीत आहे. एटीएममधून रोख रक्कम काढणे लवकरच महाग होऊ शकते. रिझर्व्ह बँक एटीएम इंटरचेंज फी आणि मोफत पैसे काढण्याच्या मर्यादेपेक्षा जास्त शुल्क वाढवण्याचा विचार करत असल्याचे समोर आले. सध्या, रिझर्व्ह बँक एका महिन्यात पाच वेळा पैसे काढण्याची सुविधा मोफत देत होती; परंतु आता या पाच व्यवहारांची मर्यादा ओलांडण्यासाठी रिझर्व्ह बँक शुल्क आणि एटीएम इंटरचेंज फी वाढवण्याचा विचार करत आहे. यासंबंधी माहिती देणाऱ्या एका अहवालात बँकेने म्हटले आहे की 'एनपीसीआय'ने विनामूल्य मर्यादा पाच वेळा गाठल्यानंतर रोख पैसे काढण्याचे शुल्क 22 रुपये करण्याची शिफारस केली आहे. याशिवाय 'एनपीसीआय'ने रोख व्यवहारांसाठी एटीएम इंटरचेंज शुल्क 17 रुपयांवरून 19 रुपयांपर्यंत वाढवण्याची शिफारस केली आहे. दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून एका मर्यादेपेक्षा जास्त पैसे काढल्यास इंटरचेंज फी आकारली जाते.ही फी म्हणजे एटीएम सेवा वापरण्याच्या बदल्यात एका बँकेने दुसऱ्या बँकेला दिलेली फी असते. अहवालानुसार, बँका आणि व्हाईट-लेबल एटीएम ऑपरेटर मेट्रो आणि नॉन-मेट्रो शहरांमध्ये शुल्क वाढवण्याच्या 'एनपीसीआय'च्या शिफारशीशी सहमत आहेत; परंतु भारतीय रिझर्व्ह बँक आणि 'एनपीसीआय'ने अद्याप या प्रकरणावर कोणतीही अधिकृत टिप्पणी केलेली नाही.

अहवालानुसार, वाढती महागाई आणि कर्ज घेण्याच्या खर्चात गेल्या दोन वर्षांमध्ये दीड ते दोन टक्के दराने वाढ, वाहतुकीवरील जास्त खर्च, रोख रक्कम भरून काढणे आणि खर्च यामुळे बिगर मेट्रो शहरांमध्ये एटीएम चालवण्याचा खर्च वेगाने वाढत आहे

दरम्यान, केळ्यांच्या वाहतुकीने जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मालामाल केले आहे. जळगावची केळी साता समुद्रापार पोहचली आहेत. केळी उत्पादनात आघाडीवर असलेल्या रावेर तालुक्यातून एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यांच्या कालावधीत 29 रॅक शेतमाल भरण्यात आला. तो केवळ दिल्लीच्या मार्केटला नेला असून एक लाख 14 हजार 675 क्विंटल एवढा होता. त्याच्या वाहतुकीमधून रेल्वेला तीन कोटी 45 लाख 87 हजार 577 रुपयाचे उत्पन्न मिळाले. यामध्ये रावेर व निंभोरा या दोन रेल्वे मालधक्क्यांचा समावेश आहे.

देशात केळीचे सर्वाधिक उत्पादन घेणाऱ्या जळगाव जिल्ह्यात रावेर तालुका आघाडीवर आहे. केळीच्या हंगामात आवक बेसुमार वाढते. त्यामुळे रोड वाहतुकीद्वारे कमी वेळेत व कमी खर्चात परराज्यातील बाजारपेठांमध्ये केळी पाठवणे शक्य होत नाही. अशा वेळी रेल्वे शेतकऱ्यांच्या मदतीला धावली. रेल्वेच्या माध्यमातून जलद आणि तुलनेत कमी खर्चात मालाची निर्यात करणे सोपे झाले आहे. केळी वाहतुकीतून रेल्वेलाही मोठा महसूल मिळाला आहे. 2023 मध्येही 34 रॅकच्या माध्यमातून 1 लाख 23 हजार 690 क्विंटल शेतमालाची वाहतूक करण्यात आली होती. त्यामधून रेल्वेला 3 कोटी 73 लाख 6 हजार 716 रुपयाचे उत्पन्न मिळाले. तो हंगाम एप्रिल ते सप्टेंबरापर्यंतचा होता. उत्पादन जास्त असल्यामुळे केळी शेतात पडून राहतात. त्यामुळे परिणाम होऊन भाव कमी मिळतो. यातून शेतकरी नाडला जातो. त्यावर रेल्वेने उपाय केला आहे.

या वेळी फळ बागायतदार सोसायटीच्या माध्यमातून रेल्वेतून केळी दिल्ली आणि उत्तर भारतात पाठवण्यात आली. दिल्ली स्थानकावर शेतमाल पोहोचल्यास स्थानिक व्यापारी उत्तर प्रदेश, हिमाचल, कुल्लू मनाली आणि इतर भागात केळ्यांची विक्री करतात. दर वर्षी मार्च महिन्यापासून नवती केळीच्या कापणीला सुरुवात होते तर एप्रिलमध्ये कापणीचे प्रमाण वाढते. उन्हात वाहतूक करताना केळी काळी पडून खराब होण्याची भीती असते. रस्ते मार्गाने वाहतूक करण्यास अधिक वेळ लागतो. त्यामुळे ट्रकमध्ये भरलेल्या मालात वरचा माल काळा पडून नुकसान होते. म्हणून एप्रिलपासून परिस्थिती आणि आवक पाहून रेल्वेमधून केळी दिल्लीला रवाना केली जातात.

आजकाल मध्यमवर्गीयांसाठी सकारात्मक बातम्या समोर येत आहेत. अलीकडेच सादर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी करामध्ये मोठी सवलत जाहीर केली. 2025-26 च्या अर्थसंकल्पात 12 लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यात आले. भाड्यावर टीडीएस कपातीची मर्यादा 2.4 लाख रुपयांवरून सहा लाख रुपये करण्यात आली. त्यानंतर रिझर्व्ह बँकेने रेपो दर 25 बेसिस पॉईंटने कमी करून 6.25 टक्के केला. यामुळे गृहकर्ज घेणाऱ्यांची मोठी बचत होईल, कारण कमी व्याजदरामुळे त्यांचा ईएमआयही कमी होईल. बँकबझार डॉटकॉमचे सीईओ आदिल शेट्टी म्हणाले की गृहकर्ज 20 वर्षांसाठी असेल आणि त्यावर 8.75 टक्के व्याज असेल आणि तुम्ही मार्चपर्यंत 12 ईएमआय भरले असतील तर रेपो दरातील 25 बेसिस पॉइंट्सच्या कपातीमुळे व्याजावर प्रति लाख 8,417 रुपयांची बचत होईल. त्याचप्रमाणे, संपूर्ण कार्यकाळात 50 लाख रुपयांच्या कर्जावर 4.20 लाख रुपयांची बचत होईल. म्हणजेच दहा 'ईएमआय'कमी होतील. इतर सर्व पॅरामीटर्स स्थिर मानून हा अंदाज लावला जात आहे. यासह मजबूत क्रेडिट स्कोअर असलेले ग्राहक 50 मूलभूत पॉइंट्स किंवा त्यापेक्षा कमी दराने पेमेंट पर्याय शोधू शकतात.








याच सुमारास देशात इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी प्रोडक्शन लिंक्ड इंसेंटिव्ह स्कीम (पीएलआय) ची कामगिरी चांगली ठरली असल्याचा सांगावा पुढे आला. यामुळे डिसेंबर 2024 पर्यंत एकूण 10,213 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. पीएलआय योजनेंतर्गत सहा लाख 62,247 कोटी रुपयांचे उत्पादन झाले आणि एक लाख 37,189 लोकांना रोजगार मिळाला. या योजनेमुळे मोबाइल फोनचे उत्पादन 2014-15 मध्ये सुमारे 60 दशलक्षवरून 2023-24 मध्ये सुमारे 330 दशलक्ष इतके वाढले. गेल्या दहा वर्षांमध्ये मोबाईल फोनच्या संख्येत पाचपट वाढ झाली आहे. मोबाईल आयात करणारा देश आता निर्यातदार झाला आहे. मोबाइल फोनचे 2014-15 मधील 19,000 कोटी रुपयांचे उत्पादन 2023-24 मध्ये चार लाख 22 हजार कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. ही वाढ प्रचंड आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाला चालना देण्यासाठी सरकारच्या धोरणांमुळे 2014-15 पर्यंत इतर देशांमधून मोबाईल फोन आयात करणारा देश आता निर्यातदार झाला आहे. आता या गोष्टी भारतात बनवल्या जाऊ लागल्या आहेत; शिवाय मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी पीएलआय योजना सुरू केल्यापासून मोबाइल फोनची निर्यात मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# 'विकसित भारताचा'मार्ग चाचपून पहाण्याची आवश्यकता !

**जागतिक पातळीवरील अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश अग्रगण्य देशांमध्ये होणार असल्याचे नगारे गेली काही वर्षे वाजत आहेत. 2047 पर्यंत 'विकसनशील'भारताचे रुपांतर 'विकसित'भारतात करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट मोदी सरकारने ठेवले आहे. प्रत्यक्षात सध्याची आर्थिक धोरणे, विद्यमान परिस्थिती, जागतिक पातळीवरील आर्थिक व भू राजकीय घडामोडी यांचा आढावा घेतला तर 'विकसित'भारताकडे जाण्याचा खात्रीशीर मार्ग सापडला असल्याचे जाणवत नाही. त्यामुळेच आपण योग्य'रस्त्याची'निवड केली आहे किंवा कसे याची चाचपणी करण्याची गरज आहे. त्याचा घेतलेला धांडोळा.**



**आर्थिक**

**प्रा. नंदकुमार काकिर्डे**

**पंढरी संचार**


विद्यमान मोदी सरकार हे सलग तिसऱ्यांदा सत्तेवर विराजमान झालेले आहे. सलग 12 वर्षे त्यांच्या हातात सत्ता लाभलेली आहे. पुढील 20 ते 22 वर्षात म्हणजे 2047 पर्यंत'विकसनशील भारताचे' रूपांतर 'विकसित भारतात'करण्याचे महत्त्वकांक्षी उद्दिष्ट मोदी सरकारने देशासमोर ठेवले आहे. मात्र गेल्या काही वर्षातील देशाची एकूण अर्थव्यवस्था, उच्चांकी महागाई व वाढती बेरोजगारी, उत्पादन क्षेत्राला जाणवत असलेली मंदीची झळ, मेक इन इंडियाला लाभलेले मर्यादित यश, आयात जास्त व निर्यात कमी असा काहीसा जमाखर्चाचा ताळेबंद, आत्मनिर्भर भारत यशस्वी होण्यामधील लाल फितीचा कारभार तसेच क्लिष्ट, काही वेळा प्रशासकीय यंत्रणेमुळे जाचक ठरणारा "जीएसटी" या सर्वांचा विचार करता'विकसित'भारताचे उद्दिष्ट गाठण्याचा निवडलेला सध्याचा मार्ग बरोबर आहे किंवा कसे याची चाचपणी करणे आवश्यक वाटते.

आपल्यासमोर विकसित भारत होण्याच्या दृष्टीने जी महत्त्वपूर्ण आव्हाने आहेत त्यात अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर हा किमान आठ ते दहा टक्के सातत्याने अनेक वर्षे गाठण्याची आवश्यकता आहे. पायाभूत सुविधांच्या क्षेत्रामध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक बदल ठरवलेल्या मुदतीत होताना दिसत नाहीत. देशभरातील मालवाहतूक,प्रवासी वाहतूक, ऊर्जा उत्पादन आणि त्याचवेळी अत्याधुनिक डिजिटल कनेक्टिव्हिटी जास्तीत जास्त कार्यक्षमपणे निर्माण होण्याची आवश्यकता आहे. मनुष्यबळ संसाधन विकास हे महत्त्वाचे आव्हान आहे. प्रचलित शिक्षण पद्धतीमध्ये आमुलाग्र बदल करण्यासाठी 'नवीन राष्ट्रीय शिक्षण'धोरण जाहीर करण्यात आले. परंतु आजतागायत त्याची यशस्वी अंमलबजावणी एकाही राज्यात होऊ शकलेली नाही. सध्या तरी याबाबत"बोलाची कढी आणि बोलाचा भात" असा प्रकार आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधा जागतिक दर्जाच्या निर्माण करण्यामध्ये आपण कमी पडत आहोत. एवढेच नाही तर देशाच्या सर्व भागांमध्ये जाणकार, कुशल कर्मचारी वर्ग निर्माण करण्यामध्येही आपले प्रयत्न यशस्वी होताना दिसत नाहीत. तरुण पिढी देशासाठी भरीव योगदान देण्यासाठी तयार आहे असे चित्र दिसत नाही. तरुण वर्गामध्ये वाढता असंतोष, अभ्यास करण्याबाबत अनास्था, असभ्यता, प्रकर्षाने जाणवणारा मोठ्यांविषयीचा अनादर, समाजातील वृद्ध, महिला वर्गाबाबत सहृदयता व कोणतेही कष्ट करण्याची तयारी याचा अभाव जाणवतो. कमी कष्टात झटपट किंवा अतिश्रीमंत होण्याची स्वप्ने तरुण पिढीला पडत असल्याचे जाणवत आहे. याच्या मुळाशी जी अनेक कारणे आहेत त्यात सामाजिक, आर्थिक असमानता, योग्य संस्कारांचा अभाव व वाढती गरिबी आहे. समाज माध्यमे (सोशल मीडिया), व मोबाईल या 'भस्मासुरांचा'लहान, तरुण व मोठ्यांवर होत असलेला विपरीत परिणाम, कुटुंब व्यवस्थेमध्ये वाढणारे कलह, वाद विवाद, घटस्फोटांचे वाढते प्रमाण दिसत आहे. तरुण पिढीमध्ये वाढती असहनशीलता निर्माण होताना दिसत आहे. त्याचबरोबर पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास आणि शाश्वत विकासाला बसत असलेली खीळ चिंताजनक आहे. विकासाच्या नावाखाली मोठ्या शहरांचे रूपांतर काँक्रीटच्या जंगलात होत असून माणुसकी हरवण्यास प्रारंभ झाला असे वाटत आहे. गेल्या अनेक वर्षात वेगाने वाढणाऱ्या तरुण पिढीचा आपल्याला अभिमान वाटत होता. परंतु लोकसंख्येची शास्त्रीय आव्हाने आपल्यासमोर उभी ठाकत आहेत. एका बाजूला लोकसंख्येचा विस्फोट होत आहे आणि त्याचबरोबर वाढते शहरीकरण आव्हानात्मक ठरत आहे. समाजातील सर्व पातळ्यांवर विशेषतः प्रशासनामध्ये जास्तीत जास्त अनास्था, अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचाराची बजबजपुरी माजलेली आहे. विविध ठिकाणच्या संस्थात्मक पातळ्यांवर सुधारणांचा अभाव असून सर्व पातळ्यांवरील प्रशासकीय अकार्यक्षमता, लाल फितीचा कारभार विकासाला मारक ठरत आहे.



देशातील प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावणे व त्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण, आरोग्य सेवा सुविधा आणि उत्तम दर्जेदार पायाभूत सुविधा यांचा खऱ्या अर्थाने लाभ मिळण्याची गरज आहे. आपण वसुधैव कुटुंबकम तत्त्वाचा अंगीकार करत असताना जागतिक पातळीवर आपला वेगळा ठसा उमटवण्याची चांगली संधी आहे. कोणत्याही बलाढ्य राष्ट्राच्या दबावाखाली न येता जागतिक पातळीवर स्वतःचे वेगळेपण निर्माण करण्याची संधी आपल्याला प्राप्त झालेली आहे. तरुण पिढीमध्ये कौशल्यपूर्ण शिक्षण, नवीनता, उद्योजकता यांना सातत्याने प्रोत्साहन देऊन सर्व संबंधित योजना कार्यक्षमपणे राबवल्या पाहिजेत. देशाची एकूण साधन संपत्ती व कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करण्यावर मर्यादा येत आहेत. देशाची नैसर्गिक साधन संपत्ती म्हणजे पाणी, जमीन व ऊर्जा यांचा समतोल वापर करण्यावर केंद्राने भर देण्याची गरज आहे.

- आज जगात अनेक देश ' श्रीमंत ' होण्यासाठी धडपड करीत आहेत. प्रत्यक्षात अगदी थोडे देश श्रीमंत असून त्यांच्या भोवती अस्तित्वासाठी झगडणाऱ्या देशांचा गराडा पडलेला आहे. जागतिक बँकेने अलीकडेच सर्व देशांची विभागणी कमी उत्पन्न, कमी मध्यम उत्पन्न, उच्च मध्यम उत्पन्न व उच्च उत्पन्न म्हणजे श्रीमंत अशा चार गटात केलेली आहे. जगात फक्त ५८ देश उच्च उत्पन्न म्हणजे श्रीमंत गटामध्ये आहेत. या गटातही एकमेकांमध्ये खूप मोठी तफावत आहे. याशिवाय २८ छोटी बेटे किंवा युरोपातल्या काही छोट्या देशांचा त्यात श्रीमंत म्हणून समावेश आहे. त्यामुळे त्यांचा विचार करता येणार नाही.
- आफ्रिका व आशियातील अनेक देश हे कमी उत्पन्न गटातील असून ज्याला 'अपयशी राष्ट्रे ' (Failed States ) म्हणतात. त्यात उत्तर कोरिया, सोमालिया, काँगो, येमेन व अफगाणिस्तान अशा देशांचा समावेश होतो. भारताचे वर्गीकरण हे कमी मध्यम उत्पन्न (लो मिडल इन्कम) गटातील देशांमध्ये केला जातो.यात बांगला देश, श्रीलंका, पाकिस्तान, म्यानमार सारखे 52 देश आहेत. याशिवाय 54 देश हे उच्च मध्यम उत्पन्न वर्गामध्ये मोडतात. या सर्वांची आकडेवारी बघितली तर जगातले 70 टक्के देश आज श्रीमंत नाहीत. श्रीमंत असलेले देश प्रामुख्याने उत्तर अमेरिका, युरोप व पूर्व आशियामध्ये आहेत. कोण्या एकेकाळी भारतात सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. परंतु मुगल व इंग्रज व अन्य परकीयांनी केलेल्या आक्रमणामुळे आपला देश "कमी मध्यम उत्पन्न" गटात जाऊन 75 वर्षे होऊन गेलेली आहेत. त्यामुळेच विकसनशील राष्ट्रांमधून विकसित राष्ट्रांमध्ये रूपांतरित होणे हे मोठे आर्थिक,सामाजिक व राजकीय असे संयुक्त आव्हान आहे. गेल्या शतकाचा आढावा घेतला तर फार थोड्या देशांना खालच्या तळातून एक पायरी वरच्या तळामध्ये जाण्यामध्ये यश लाभलेले आहे. आपल्याला तर दोन पायऱ्या वर जाण्याची अपेक्षा आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर दक्षिण कोरिया, जपान, सिंगापूर व तैवान या केवळ चार राष्ट्रांनीच श्रीमंत देश होण्यात यश मिळवलेले आहे. आजही चीन हा देश श्रीमंत देशात गणला जात नाही. तो अद्यापही उच्च मध्यमवर्गीय उत्पन्न असणारा देश आहे. त्याचप्रमाणे मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, दक्षिण आफ्रिका, मेक्सिको या देशांनीही अजून विकसित देशाचे उद्दिष्ट गाठलेले नाही. त्यामुळे भारत देश हे उद्दिष्ट गाठू शकेल किंवा कसे याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे.



- कोणत्याही देशाला श्रीमंत व्हायचे असेल तर त्याचा मूलमंत्र जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी देत असते. आर्थिक शिस्त, व्यापार आणि आर्थिक उदारीकरण,खाजगीकरण,खुली बाजारपेठ व खुली स्पर्धा असे त्यांचे परवलीचे शब्द असतात. या सर्वांना जागतिक व्यवस्थेमध्ये"वॉशिंग्टन एकमत" म्हणतात. मात्र या मार्गाने आजतागायत एकही देश श्रीमंत झालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. यावर्षीचे नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या जेम्स रॉबिन्सन व डेरॉन ॲकेमोगलू यांचा प्रबंध संशोधन " राष्ट्रे अपयशी का होतात" यावरच आहे.त्यांच्या अभ्यासानुसार भारत देशातील आर्थिक संस्था गरीब आहेत आणि आपण उत्खनन म्हणजे "वसुली" केल्यासारखी अर्थव्यवस्था चालवतो. केवळ वेगाने आर्थिक विकास केला म्हणून श्रीमंत होणार नाही. त्यासाठी स्वतंत्र आर्थिक राष्ट्रवाद जपणे आवश्यक आहे. देशातील तरुण उद्योगांना संरक्षण देत असतानाच काही निवडक उत्तम तंत्रज्ञान आयात करणे आवश्यक आहे. देशांतर्गत उद्योगातील सुदृढ स्पर्धा ही जागतिक पातळीवरील निर्यातीसाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील किंवा खाजगी क्षेत्रातील अकार्यक्षम उद्योग संस्था बंद करणे आवश्यक आहे.
- चीनने गेल्या काही वर्षात ज्या पद्धतीने औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्रांती केली त्याच्या आपण जवळपास पण जाऊ शकलेलो नाही. आजही छोट्या मोठ्या व मध्यम उद्योगांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.पदोपदी भ्रष्टाचाराचा सामना करावा लागतो, कार्यक्षम कुशल कामगार वर्ग मिळणे दुरापास्त आहे. त्यात भर म्हणून की काय वाढती गुंडगिरी, कंत्राटदारांचा धुमाकूळ, राजकीय वरदहस्त असलेले खंडणी बहाद्दर यामुळे आपण उद्योग व उद्योजकताच नष्ट करत आहोत. बहुतेक सर्व राज्यात सर्वसाधारणपणे हेच चित्र आहे. सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग पांढरा हत्ती बनलेले आहेत. मुठभर भांडवलदारांच्या हातात देशाचा उद्योग, व्यापार देण्यापेक्षा सर्व स्तरांवर उद्योजकतेचे वारे निर्माण केले पाहिजे, त्यासाठी योग्य वातावरण निर्मिती केली पाहिजे, तरुण वर्गाला कौशल्य प्रशिक्षण देणे आणि रोजगार निर्मितीला खऱ्या अर्थाने चालना देणे असे प्रत्यक्षात घडले तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल. मात्र त्यासाठी दर पाच-दहा वर्षांनी विद्यमान स्थितीचे सिंहावलोकन करणे आवश्यक आहे. आजची भारतातील स्थिती काहीशी प्रतिकूल व निराशा जनक आहे. त्यात बदल होऊ शकतो पण त्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न करून योग्य मार्गाने वाटचाल करण्याची गरज आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

» Selected

## रेशनिंगच्या धान्य पुरवठ्यात वाढ करावी : उपसरपंच विठ्ठल ढोबळे



पारगाव (कारखाना) येथे रेशनिंगच्या धान्य पुरवठ्यात वाढ करावी अशी मागणी पारगावचे माजी आदर्श उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी तहसीलदार संजय नागटिळक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे ( ज्ञानेश गायकवाड . गावडेवाडी)

**अवसरी :** पारगाव (ता . आंबेगाव )येथील गावठाणात स्थानिकांप्रमाणेच भीमाशंकर सहकारी साखर कारखाना कामगार ,बाहेरगावाहून आलेला नोकरदार वर्ग, व नागरिक राहतात परंतु त्यांना मोफत रेशनिंगचा धान्याचा लाभ घेता येत नाही कमी पुरवठ्यामुळे अनेक जण धान्यापासून वंचित राहतात त्यांना रेशनिंगच्या लाभ मिळावा यासाठी अन्नधान्य पुरवठा विभागाने रेशनिंग सीधा पुरवठ्यात वाढ करावी अशी मागणी पारगाव चे माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांनी आंबेगाव चे तहसीलदार संजय नागटिळक यांच्याकडे केली आहे . गुरुवारी ( ता . १३ ) रोजी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात विठ्ठल ढोबळे यांनी नमूद केले आहे की पारगाव चा विस्तार झपाट्याने होत आहे येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना, दत्तात्रेय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालय डी.जी. वळसे पाटील इंग्रजी माध्यम येथील बहुतांश नागरिक व माता पालक राहत आहेत त्यांना शासनाच्या रेशनिंग योजनेचा लाभ घेता येत नाही पारगाव येथील स्वस्त धान्य दुकानात येणाऱ्या पुरवठ्यात बरीच वाढ करणे गरजेचे आहे अशी ही मागणी विठ्ठल ढोबळे यांनी निवेदनात केलेली आहे याप्रसंगी नायब तहसीलदार शांताराम किरवे , नायब तहसीलदार डॉ . सचिन वाघ पुरवठा अधिकारी माधुरी संतोषवार तुषार कोरडे, जगदीश पोंदे, निलेश पिंगळे, आदी उपस्थित होते

## दिघीत ओळख श्री ज्ञानेश्वरीची उपक्रमास हरिनाम गजरात प्रारंभ



**आळंदी :** दिघी साई पार्क सैनिक कॉलनी येथील क्रांतिसिंह नाना पाटील शिक्षण मंडळाच्या यशवंतराव चव्हाण विद्यालयातील प्राथमिक व माध्यमिक तसेच बालक मंदिर विद्यालया मध्ये आज ओळख श्री ज्ञानेश्वरी ची या उपक्रमाचा प्रारंभ श्री ओळख ज्ञानेश्वरी एक परिवार, श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष श्री प्रकाश काळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संजय गरुड अध्यक्षस्थानी होते. याच उपक्रमात श्री संत सेवालाल यांची जयंती देखील प्रशालेत साजरी करण्यात आली. समितीचे अध्यक्ष श्री प्रकाश काळे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रम प्रसंगातील काही क्षणचित्र. यावेळी श्री अर्जुन मेदनकर, संजय गरुड, सचिव अजित गरुड, प्राजक्त हरफळे, विश्वंभर पाटील,संस्थेचे पदाधिकारी अध्यक्षा स्वाती गरुड, सचिव अजित गरुड, प्राचार्या मनिषा निकम, मुख्याध्यापक, संचालक,शिक्षक, शालेय मुले उपस्थित होते. उत्साहात उपक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रशालेत अभंग, पसायदान गायन झाले. श्रींचे प्रतिमापूजन तत्पूर्वी प्रतिमा आणि संत साहित्य प्रशालेस सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्राचार्या मनिषा निकम यांचेसह शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

## सुवर्णा चव्हाण यांचा कांबळेश्वरमध्ये गावरान फिल्म्स कडून विशेष सन्मान



**बारामती :** गावरान फिल्मसच्या पाचव्या वर्धापन दिना निमित्त भव्य कलाकार सन्मान सोहळा तालुक्यातील कांबळेश्वर येथे आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी अभिनेत्री सुवर्णा चव्हाण [दाणेवाडी ता.कोरेगाव] यांनी अव्वल मराठी वेबसिरिज चांडाळ चौकडीच्या करामती मधील सादर केलेली दुर्गा हे कॅरेक्टर लोकांच्या पसंतीस उतरले आहे. या प्रसिद्ध कलाकाराने दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी वाठार स्टेशन परिसरातिल ग्रामीण भागातून कला क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे.त्या अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून आपली आवड म्हणून काम करत जिद्दीने आणि चिकाटीने या क्षेत्रात यशाच्या शिखरावर आहेत.त्यांनी वेबसिरिज,टीव्ही मालिका,शॉर्ट फिल्म्स,चित्रपट इत्यादीमधे कलाकार म्हणून कार्यरत आहेत.या निमित्ताने त्यांना लेखक,दिग्दर्शक अनिल माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आणि संपूर्ण कुटुंबाने साथ दिली.असे सुवर्णा यांनी मनोगतात मन व्यक्त केले




सह्याद्री कुशीतील पश्चिम धोम धरण बनले पर्यटकांचे आकर्षण केंद्र राज्यात आता उन्हाळ्याची चाहुल लागली असून पुण्यापासून नव्वद किलो मीटर अंतरावरील वाई धोम धरण महाबळेश्वर सह्याद्री कुशीत धोम जलाशयात पर्यटन सज्ज झाले असून महाराष्ट्र सह गुजरात कर्नाटक राज्यतून पर्यटक येत असतात. (विजयकुमार हरिश्चंद्रे )

# शहिदांना खेडमध्ये श्रद्धांजली

## पुलवामा हल्ला : नागरिकांनी केले सामूहिक अभिवादन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** जम्मु काश्मीर येथे १४ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या पुलवामा येथील आतंकवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात केंद्रिय राखीव पोलीस दलातील ४४ जवान शहीद झाले होते.या शहिदांना राजगुरुनगर येथे शुक्रवारी (दि १४) सामुहिक अभिवादन करण्यात आले. राजगुरुनगर एस टी बस स्थानक परिसरातील हुतात्मा राजगुरू ,भगतसिंग, सुखदेव यांच्या स्मृती शिल्प आवारात योद्धा माजी सैनिक संघटनेकडून श्रद्धांजलीपर स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

पुलवामा शहीद स्मृती दिनाच्या निमित्ताने खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौंडे यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. योद्धा माजी सैनिक संघटनेचे संस्थापक, अध्यक्ष साहेबराव जाधव व सहकारी तसेच खेड तालुक्यातील सर्व बीएसएफ आयटीबीपी, सीआरपीएफ, सीआयएसएफ, आसाम रायफल , आर्मी नेव्ही एअर फोर्स मधील आजी-माजी सैनिक परिवार यावेळी उपस्थित होते. आपल्या देशाचे संरक्षण एकता व अखंडता कायम राखण्यासाठी सर्व संरक्षण दलातील जवान आपल्या प्राणांची बाजी लावून देशाच्या सीमेची रक्षा करत असतात. त्यामध्ये फ्रंट लाईन सुरक्षा म्हणजे बीएसएफ चे जवान करतात. चीन आणि तिबेट या ठिकाणच्या भारत सीमेवरील सुरक्षा आयटीबीपी चे जवान करतात. तसेच नेपाळची सीमा एसएसबी या संरक्षण दलाकडून सुरक्षित ठेवली जाते.



पुलवामा हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली समर्पित करताना खेड तालुक्यातील माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी.

आपल्या आशिया खंडातील सर्वात मोठे पॅरामिलिटरी फोर्स म्हणजे सीआरपीएफ या संरक्षण दलातील जवान भारतातील आतंकवाद ग्रस्त काश्मीर, पंजाब पूर्वोत्तर राज्य आणि छत्तीसगड सारख्या नक्षलवाद असणाऱ्या दुर्दांत क्षेत्रामध्ये आपले कर्तव्य बजावत असतात. सी आर पी एफ च्या केवळ ३०० जवानांनीच सरदार पोस्ट कच्छ या ठिकाणी पाकिस्तान सैन्याच्या साडेतीन हजार संख्या असलेल्या ब्रिगेड सोबत देखील लढा दिला होता. आणि या युद्धामध्ये विजय देखील मिळाला होता. असे महान कार्य असणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांना पुलवामा येथे फेब्रुवारी २०१९ मध्ये वीर मरण आले. त्यांच्या कार्याला सलाम करत राहू असे साहेबराव जाधव यावेळी म्हणाले.

## ॲड. नवनाथ निघोट यांची नोटरीपदी नियुक्ती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** मंचर (ता. आंबेगाव) येथील ॲड. नवनाथ राजाराम निघोट यांची भारत सरकारने नोटरीपदी नियुक्ती केली आहे. ॲड. निघोट यांनी सन २००५ पासून घोडेगाव कोर्टात वकिलीला सुरुवात केली. दिवाणी फौजदारी आणि बँकिंग क्षेत्रामध्ये वकिली केली. पुणे जिल्हा सहकारी बँक, शरद सहकारी बँक, लाला अर्बन बँक, राजगुरुनगर सहकारी बँक, साधना सहकारी बँक व तालुक्यातील अनेक पतसंस्थांवर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. निघोट काम करतात. त्यांच्या वकिलीला वीस वर्षे पूर्ण झाली. घोडेगाव वकील संघटनेमध्ये सचिव व उपाध्यक्ष पदावर काम केले आहे.

या पुढील काळात ज्येष्ठ नागरिक व गरीब जनतेला मोफत सेवा देणार असल्याचे निघोट यांनी बोलताना सांगितले

# आंबेगाव तालुक्यातील धोकादायक गावांचे सीएसआर फंडामधून पुनर्वसन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील जांभोरी काळवाडी नंबर एक व दोन पोखरी बेंढारवाडी माळीण पसरवाडी मेघोली पांचाळे बुद्रुक या अति संवेदनातील धोकादायक गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वचना संदर्भात शासकीय निधी सोडून सी आर सी एस आर फंड उपलब्ध करून दिला जाईल या महिन्याअखेर कामे सुरू झाली पाहिजेत असे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी बोलविलेल्या बैठकीला जितेंद्र डुडी यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या .



आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विषयांच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील यांचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी प्रांताधिकारी गोविंद शिंदे तहसीलदार संजय नागटिळक प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई जिल्हा शल्यचिकित्सक डॉ . नागनाथ यमपल्ली वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे माजी सभापती सुभाष मो रमा रे माजी सभापती संजय गवारी आदी उपस्थित होते.

यावेळी तळेघर ग्रामीण रुग्णालय सुरू करण्यासाठी कर्मचारी न नेमावेत महाशिवरात्रीच्या दिवशी रुग्णालय सुरू झाले पाहिजे कातकरी कुटुंबाच्या घरांसाठी जागा संपादन करणे आदिवासी भागातील धरणाच्या कामाचे नियोजन करून जास्तीत जास्त कामे सुचवा त्याला निधी दिला जाईल असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.

## खरपुडी बु. ग्रामपंचायतीत भाऊ सरपंच, बहिण उपसरपंच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खरपुडी बु. , ता.खेड ग्रामपंचायतीत सख्ख्या भाऊ बहिणीला सरपंच, उपसरपंच होण्याचामानमिळालाआहे.खेड कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे हे भाऊ खरपुडीचे सरपंच आहेत.तर बहिण सरस्वती बबन काशीद यांची शुक्रवारी (दि १४) उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाली.

ग्रामपंचायतीत दोन्ही महत्त्वाच्या पदावर भावा, बहिणीला संधी उपलब्ध झाल्याने समर्थकांनी जल्लोष केला. रिक्त झालेल्या उपसरपंच पदाची निवडणुक सरपंच जयसिंग भोगाडे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सदस्यांची विशेष बैठक बोलावण्यात आली होती.सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

त्यात सरस्वती काशीद




एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांना निवडणुक निर्णय अधिकारी ग्रामसेविका दिपाली भोर यांनी बिनविरोध निवडीची घोषणा केली. सदस्य मंगल गायकवाड, प्रणील चौधरी, गुलाबाई चौधरी, किरण शिंदे, अश्विनी बरबटे, ज्योती काशीद, विशाल काशीद, साहेबराव भोगाडे यांसह संजय गायकवाड, अनिल शिंदे, नामदेव भोगाडे, ज्ञानेश्वर भोगाडे, संजय काशीद व ग्रामस्थ यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते. - फोटो - जयसिंग भोगाडे आणि सरस्वती काशीद यांचे आय कार्ड फोटो पाठवले आहेत.

## प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांच्या पुढाकारातून अभिनव उपक्रम

# आश्रम शाळेतील विद्यार्थी चाखणार आता स्ट्रॉबेरीची चव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** आंबेगावच्या आदिवासी शेतकऱ्यांनी पिकवलेली स्ट्रॉबेरी आदिवासी विकास विभागाने विकत घेऊन आश्रमशाळेतील मुलांना रोजच्या आहारात दिली आहे. प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी पुढाकार घेऊन हा अभिनव कार्यक्रम सुरू केला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना रोजच्या आहारात स्ट्रॉबेरी देणारा महाराष्ट्रातपहिला प्रकल्प, अशी नोंद यामुळे झाली आहे. अशी माहिती आदिवासी प्रकल्प विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई व सहाय्यक प्रकल्प अधिकारी सोनुल कोतवाल यांनी दिली.



घोडेगाव (ता. आंबेगाव) मध्यवर्ती स्वयंपाकगृहात स्ट्रॅाबेरी खरेदीसाठी वजन करताना प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई आणि शेतकरी. ( छाया - ज्ञानेश गायकवाड ,गावडेवाडी )

आदिवासी विकास विभागाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतून आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील ५५ शेतकऱ्यांना स्टॉबेरी लागवडीसाठी व साहित्य खरेदीसाठी अनुदान दिले आहे. यातून शेतकऱ्यांनी संपूर्ण सेंद्रिय स्टॉबेरी पिकवली आहे. ही पिकवलेली स्टॉबेरी शेतकरी भीमाशंकरकडे जाणाऱ्या रस्त्यावर विकतात किंवा पुणे-मुंबई सारख्या मोठ्या बाजारपेठांमध्ये पाठवत आहेत.

प्रकल्प अधिकारी प्रदिप देसाई यांनी ही स्टॉबेरी आपण खरेदी करून आश्रमशाळेतील मुलांच्या आहारात रोज खायला देवू अशी कल्पना सुचली. त्यांनी स्टॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना कळवून घोडेगाव येथे सुरू असलेल्या मध्यवर्ती स्वयंपाकगृहात आपण पिकवलेली स्टॉबेरी आणून द्या, याठिकाणी वजन करून लगेच पैसे घेऊन जा, असे आवाहन केले. याला बोरघर परिसरात शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला. पहिल्याच दिवशी २५ किलो स्टॉबेरी जमा झाली. याठिकाणी वजन करून २३० रुपये किलोप्रमाणे त्यांना पैसे देण्यात आले. यावेळी सहायक प्रकल्प अधिकारी सोनुल कोतवाल, अधिक्षक विपुल टकले, समाजसेविका जनाबाई उगले हे उपस्थित होते.

> “ आदिवासी शेतकऱ्यांनी पिकवलेली स्ट्रॅाबेरी आदिवासी मुलांना खायला देत असल्याचा आज मनस्वी आनंद होत आहे. शेतकरीदेखील याला चांगला प्रतिसाद देत आहेत. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी पुढाकार घेऊन ही योजना सुरू करायला लावली. याचा चांगला फायदा शेतकऱ्यांना होत आहे. पुढील वर्षी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी झाले पाहिजे.
>
> **- प्रदीप देसाई,** प्रकल्प अधिकारी

### ही योजना खऱ्या अर्थाने आदिवासींच्या कल्याणासाठी'

● स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी संतोष शेळके व जनाबाई उगले म्हणाल्या, "कोणतेही औषध, खत न मारता संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने पिकवलेली स्ट्रॉबेरी आमच्याच मुलांना खायला मिळत आहे, याचा मनापासून आनंद होतोय. राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील व प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेली योजना आज खऱ्या अर्थाने आदिवासींच्या कल्याणासाठी राबवली गेली असल्याचे यातून दिसले.

# वेलकम वर्ल्ड

# क्रिती खरबंदाचा हटके लूक!



बॉलिवूड अभिनेत्री क्रिती खरबंदा तिच्या हटके लूकसाठी नेहमीच चर्चेत असते. दरम्यान, अभिनेत्रीने पुन्हा एकदा तिच्या बोल्ड अवताराने सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. नुकतेच तिने फ्लोरल ड्रेसमधील काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केले आहेत, ज्यात क्रिती अत्यंत हॉट दिसत आहे. क्रितीने हलका मेकअप केला असून केसांची खास स्टाइल तिला उठून दिसत आहे, ज्यामुळे ती अधिकच आकर्षक दिसत आहे. हे फोटो आणि व्हिडिओ पाहिल्यानंतर चाहते क्रिती खरबंदाच्या हॉटनेसचे वेडे झाले आहेत. तिचे फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसंत केले जात असून लोक उत्स्फुर्तपणे कमेंट करत आहेत. क्रितीच्या प्रोफेशनल आयुष्याबद्दल सांगायचं तर, २००९ मध्ये तेलुगू चित्रपट 'बोनी' द्वारे आपल्या कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या कृतीने बॉलिवूडमध्ये 'हाऊसफुल ४', 'गेस्ट इन लंडन', 'शादी में जरूर आना' असे अनेक चित्रपट केले आहेत. अभिनेत्रीने अलीकडेच तिच्या 'शादी में जरूर आना' या चित्रपटाची सात वर्षे साजरी केली.

✦✦✦

# 'छावा' आला भेटीला!

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' हा छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यगाथेवर आधारित ऐतिहासिक चित्रपट येत्या १४ फेब्रुवारी २०२५ रोजी संपूर्ण जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या अ‍ॅडव्हान्स बुकिंगला सुरूवात झालेली असून चाहत्यांमध्ये याबाबत जबरदस्त उत्सुकता पाहायला मिळत आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा' हा एक हिस्टोरिकल ड्रामा असलेला चित्रपट आहे. मराठा साम्राज्याचे शासक छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित असलेल्या चित्रपटात विकी कौशलने प्रमुख भूमिका साकारली आहे. चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाल्यापासून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाची उत्सुकता आहे. चित्रपटाच्या अ‍ॅडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाल्यानंतर अवघ्या काही तासांमध्येच चाहत्यांनी वेळ न दवडता आपली तिकिटे बुक केली आहेत. सध्या ऑनलाईन आणि थिएटर्सच्या तिकिटबारीवर 'छावा' चित्रपटावर पैशांचा पाऊस पडतोय, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. चित्रपटाने रिलीज होण्यापूर्वीच सुमारे ३४ ते ३५ लाख रुपये कमावले. या भव्य ऐतिहासिक चित्रपटाचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले असून, साउंडट्रॅक ए. आर. रहमान यांनी संगीतबद्ध केला आहे. गाणी प्रसिद्ध गीतकार इरशाद कामिल यांनी लिहिली आहेत. 'छावा' हा चित्रपट सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक शिवाजी सावंत यांच्या 'छावा' या ऐतिहासिक कादंबरीवर आधारित आहे. चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत अभिनेता विकी कौशल आणि महाराणी येसूबाईंची भूमिकेत रश्मिका मंदाना पाहायला मिळणार आहेत. तर, औरंगजेबाच्या भूमिकेत अभिनेता अक्षय खन्ना दिसणार आहे.

✦✦✦



# 'गेमचेंजर' ओटीटीवर करणार का कल्ला?



राम चरणचा 'गेमचेंजर' चित्रपटगृहांमध्ये फ्लॉप ठरला. सिनेमागृहात या चित्रपटाने चांगली कमाई केली नाही आहे. आता हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर येण्यास सज्ज झाला आहे. शंकर दिग्दर्शित आणि राम चरण अभिनीत 'गेमचेंजर' हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. या ॲक्शन एंटरटेनर चित्रपटाला चांगली सुरुवात झाली असली तरी दुसऱ्या दिवसापासून त्याच्या कमाईत घसरण झाली. यासह, गेमचेंजर आता ओटीटीवर झळकण्यास सज्ज झाला आहे. चित्रपटगृहातून बाहेर पडल्यानंतर, हा चित्रपट आता ओटीटीवर काय धमाल करतो हे पाहणे उत्कंठाचे ठरणार आहे. अंदाजे ४५० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर फक्त १३०.७४ कोटी रुपये कमावले. शंकर दिग्दर्शित 'गेमचेंजर' हा कार्तिक सुब्बाराज यांनी लिहिलेला एक राजकीय थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात राम चरण, कियारा अडवाणी, अंजली, एसजे सूर्या, श्रीकांत, जयराम आणि नवीन चंद्रा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. श्री वेंकटेश्वर क्रिएशन्स निर्मित 'गेमचेंजर' या चित्रपटाचे संगीत थमन, छायांकन तिरु आणि संकलन शमीर मुहम्मद यांचे आहे. हा चित्रपट १० जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित झाला होता.

✦✦✦

# ऐश्वर्य ठाकरेचे सिनेविश्वात पदार्पण!



बाळासाहेब ठाकरे यांचा नातू ऐश्वर्य ठाकरे हा लवकरच सिनेविश्वात पदार्पण करणार आहे. तो प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यप याच्या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये एन्ट्री करणार आहे. ऐश्वर्य ठाकरे हा बाळासाहेब ठाकरे यांचा मुलगा जयदेव ठाकरे आणि स्मिता ठाकरे यांचा धाकटा मुलगा आहे. तो सोशल मीडियावर खूप ॲक्टिव्ह असून त्याचा चाहता वर्ग देखील मोठा आहे. त्याच्या पोस्ट्सला चाहत्यांकडून मोठी पसंती मिळत असते. ऐश्वर्य ठाकरे याला सिनेमांची आवड असून त्याने यापूर्वी संजय लीला भन्साळी यांच्या 'बाजीराव मस्तानी' चित्रपटासाठी सहाय्यक दिग्दर्शक काम केले होते. यावेळी त्याने अभिनयाचेही धडे घेतले. याशिवाय त्याला नृत्याची देखील आवड आहे. अनुराग कश्यप हा 'गँग्स ऑफ वासेपूर'च्या पार्श्वभूमीवर तशाच धाटणीचा एक नवीन चित्रपट बनवत आहे. 'निशानची' असे या चित्रपटाचे नाव आहे. जार पिक्चर्सने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटात ऐश्वर्य हा उत्तर भारतातील छोट्या शहरांमधून आलेल्या एका स्वयंप्रशिक्षित शूटरची भूमिका साकारताना दिसणार आहे. तो उत्तर भारतातील एका छोट्या भागातून आलेला शूटर असून तो त्याच्या वयाच्या शूटर्सपेक्षा माहिर आहे. त्यामुळे तो आपल्या समवस्कांच्या खूप पुढे आहे. भूमिकेसाठी ऐश्वर्यने उत्तर भारतातील तरुणांची बोली, त्यांचे उच्चारण यांचा अभ्यास करून त्याचप्रकारे बोलण्याचे कौशल्य विकसित केले. हा चित्रपट ऐश्वर्यला २०२० मध्ये मिळाला होता. त्यानंतर त्याने दोन वर्षे येथील बोलीभाषा आणि देहबोलीवर काम केले. चित्रपटाचे कथानक १९९६ पासून २०१६ असा २० वर्षांच्या कालावधीत फिरते. गँग्स ऑफ वासेपूरमध्ये ज्याप्रमाणे रामधीर सिंग आणि सरदार खान यांच्यातील कौटुंबक कलह दाखवण्यात आला होता. तसाच संघर्ष निशानचीमध्ये देखील आहे. 'निशानची' चित्रपटात 'जामतारा' वेबसिरीजमधून ओळख मिळवलेली मोनिका पवार देखील दिसणार आहे. चित्रपटाचे चित्रीकरण उत्तर प्रदेशात पूर्ण करण्यात आले आहे. अनुरागच्या अन्य चित्रपटांप्रमाणेच निशानची देखील एक संगीतमय चित्रपट आहे. या चित्रपटात २० गाणी आहेत. पियुष मिश्रा यांच्या कवितांमधून यातील बरीच गाणी घेतली आहेत.

✦✦✦



# री-रिलीजला केली एवढी कमाई!

२०१६ चा रोमँटिक चित्रपट 'सनम तेरी कसम' जवळजवळ नऊ वर्षांनी पुन्हा प्रदर्शित झाला आणि पुन्हा एकदा प्रेक्षकांना थिएटरमध्ये आकर्षित करण्यात यशस्वी झाला. 'सनम तेरी कसम' हा चित्रपट पहिल्यांदा पाच फ `ब्रुवारी २०१६ रोजी प्रदर्शित झाला. हा चित्रपट नऊ वर्षांनी पुन्हा सिनेमागृहात प्रदर्शित झाला. त्यावेळी हा चित्रपट २५ कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता आणि चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर सुमारे ५६ कोटी रुपये कमावले होते. चित्रपटाची कथाही राधिका राव आणि विनय सप्रू यांची होती. कमाल आर. खान यांनी 'सनम तेरी कसम'च्या रिलीज झालेल्या बॉक्स ऑफिस कलेक्शनबद्दल ट्विट केले आहे आणि चित्रपटाच्या कलेक्शनची माहिती दिली आहे. 'सनम तेरी कसम' हिंदी सिनेमाच्या इतिहासात सर्वात लोकप्रिय अशी लव्हस्टोरी असणाऱ्या सिनेमाने प्रेक्षकांच्या मनात कायम घर केलं. सिनेमातील गाणीही आजही प्रेक्षकांच्या ओठांवर आहेत. निर्माते आणि दिग्दर्शकांनी आठ वर्षांनी चाहत्यांना चित्रपटाच्या सीक्वेलची गुडन्यूज दिली. यामध्ये हर्षवर्धन राणे मुख्य भूमिकेत दिसणार आहे. बाकी स्टारकास्टबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. सोहम रॉकस्टार एंटरटेन्मेंटच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन 'सनम तेरी कसम २' बाबत पोस्ट करण्यात आली होती. चित्रपटाच्या सिक्वेलची घोषणा सप्टेंबर २०२४ मध्ये करण्यात आली होती.

✦✦✦

# 'ठरलं तर मग'मध्ये लगीनघाई

स्टार प्रवाहच्या ठरलं तर मग मालिकेचं कथानक सध्या अतिशय रोमांचक वळणावर येऊन पोहोचलं आहे. पूर्णा आजीच्या हट्टाखातर अर्जुन तन्वीशी लग्न करण्यासाठी तयार झालाय. अर्जुनने मनाविरुद्ध जाऊन हा निर्णय घेतला असला तरी सायलीने मात्र अर्जुन आणि तन्वीचं लग्न होऊ द्यायचं नाही हे मनाशी पक्क ठरवलं आहे. त्यासाठीच वेश बदलून सायली लग्नाच्या विधींमध्ये सहभागी झाली आहे. एकीकडे अर्जुन आणि तन्वीचा हळदी सोहळा सुरु




असताना अर्जुनची उष्टी हळद मात्र सायलीला लागणार आहे. तू ही रे माझा मितवा मालिकेतल्या ईश्वरी आणि तिच्या बहिणीच्या प्लॅनमुळेच हे शक्य झालं आहे. मेहंदी, संगीत सोहळा आणि आता अर्जुनच्या नावाची उष्टी हळद असं सारं काही आतापर्यंत सायलीच्या मनासारखं झालं आहे. त्यामुळे सायली आणि अर्जुनचीच लग्नगाठ बांधली जाणार का? याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

✦✦✦


# '... जंगल'मध्ये स्वागत

'स्क्विड गेम' ही लोकप्रिय कोरियन वेब सिरीजचा दुसरा सीझन नेटफ्लिक्सवर प्रसारित झाला होता, जो प्रेक्षकांना खूप आवडला होता. असाच मृत्यूचा खेळ आता बॉलिवूडमध्येही पाहायला मिळणार आहे. नुकताच 'वेलकम टू द जंगल'चा टीझर रिलीज झाला आहे. बॉलिवूडच्या या बहुप्रतिक्षित विनोदी चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, संजय दत्त, रवीना टंडन, लारा दत्ता आणि दिशा पटानी असे एकूण २५ स्टार आहेत. हा चित्रपट 'वेलकम'चा तिसरा फ्रँचायझी असणार आहे. अहमद खान दिग्दर्शित 'वेलकम टू जंगल' या चित्रपटाच्या टीझरवरून हे स्पष्ट होते की हा चित्रपट तुम्हाला जंगलाच्या एका साहसी प्रवासावर घेऊन जाणार आहे. टीझरमध्ये संपूर्ण स्टारकास्ट लष्करी गणवेशात दिसत आहे. कृष्णा अभिषेक, किकू शारदा आणि राजपाल यादव हे देखील टीझरमध्ये विनोदी चव आणण्यासाठी सज्ज झाले आहेत. या चित्रपटामध्ये तगडी स्टारकास्ट आहे. 'वेलकम टू जंगल' चा टीझर कोरियन वेब सिरीज 'स्क्विड गेम' ची आठवण करून देणारा आहे. त्या मालिकेत, १००० खेळाडू पैशाच्या लोभाने खेळ खेळण्यासाठी पोहोचतात. जर ते खेळ हरले तर त्यांना मृत्यूचा सामना करावा लागतो. 'वेलकम टू जंगल' देखील असेच काहीसे दिसते, ज्यामध्ये प्रत्येकजण पैशाच्या लोभाने जंगलात पोहोचतो पण येथून बाहेर पडणे अशक्य वाटते.

✦✦✦



# पुन्हा 'मिशन इम्पॉसिबल'



हॉलिवूड स्टार टॉम क्रूझने त्याच्या चाहत्यांना आश्चर्यचकित केले आहे. त्याने त्याच्या आगामी 'मिशन इम्पॉसिबल द फायनल रेकनिंग' या चित्रपटाचा टीझर रिलीज केला. त्याने टीझरने चाहत्यांना आनंद दिलाच नाही तर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही सांगितली. टीझर शेअर करताना टॉम क्रूझने लिहिले, 'तू जे काही होतास, जे काही केलेस, ते सर्व इथेच आले आहे. मिशन: इम्पॉसिबल – द फायनल रेकनिंग. २३ मे २०२५ रोजी चित्रपटगृहात भेटू या.' २३ मे २०२५ रोजी प्रदर्शित होणारा 'द फायनल रेकनिंग' हा २०२३ च्या 'डेड रेकनिंग पार्ट वन'चा सिक्वेल आहे. या फ्रँचायझीमधील आठवा चित्रपट क्रिस्टोफर मॅकक्वेरी यांनी दिग्दर्शित केला आहे. यात हेन्री चेर्नी, हेली एटवेल, विंग रेम्स, सायमन पेग, पोम क्लेमेंटीफ आणि व्हेनेसा किर्बी यांच्याही भूमिका आहेत. या चित्रपटात हन्ना वॅडिंगहॅम, निक ऑफरमन, केटी ओ'ब्रायन आणि ट्रॅमेल टिलमन हे देखील महत्त्वाच्या भूमिका साकारताना दिसतील. टॉम क्रूझला अद्भुत स्टंट आणि ॲक्शन करताना पाहणे खूप छान आहे. तो प्रत्येक वेळी त्याच्या चित्रपटात असे काहीतरी घेऊन येतो जे चाहत्यांना प्रभावित करते.

✦✦✦

गंगा नदीत डुबकी



राज्याचे मंत्री नितेश राणे यांनी गंगास्नान करत आपल्या धार्मिक भावना व्यक्त केल्या. नितेश राणेंनी आई निलम राणे यांच्यासह प्रयागराजमधील पवित्र कुंडात डुबकी घेतली. गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या संगमात स्नान करून सनातन धर्माच्या गौरवशाली परंपरेचा अनुभव यामुळे मिळाला.

## न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेत १२२ कोटींची हेराफेरी

**मुंबई :** न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणी बँकेचा माजी महाव्यवस्थापक हितेश मेहताला ताब्यात घेतलं. त्यानंतर आरबीआय अधिकाऱ्यांसमोर हितेश मेहताने १२२ कोटींचा घोटाळा केल्याचं कबुल केलं. त्यानंतर हितेश मेहताला अटक करण्यात आली आहे. हितेश मेहता कोव्हीड काळात बँकेतून पैसे काढत होता. हितेश मेहता बँकेतील पैसे जवळची सहकारी आणि मित्रांना वाटत होता. या प्रकरणाची पुढील तपासणी आर्थिक गुन्हे शाखेने सुरु केली आहे. मुंबईच्या दादरमधील बँकेत हितेश मेहताने हा प्रकार केला. १२२ कोटींच्या हेराफेरीनंतर पोलिसांनी अटक केली आहे. या हितेश मेहताविरोधात सर्वसामान्य खातेदारांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## फर्टिलायझर्स केमिकल कंपनीत गळती!

**राजस्थान :** कोटा जिल्ह्यातील सांगोद विधानसभा मतदारसंघातील गडेपन येथील सरकारी शाळेत काही मुले बेशुद्ध पडल्याची, उलट्या झाल्याची आणि आजारी पडल्याची घटना समोर आली आहे. एकामागून एक मुले खाली पडू लागली. त्यांना शाळेजवळील रुग्णालयात नेण्यात आले जिथून आणखी ६ गंभीर मुलांना कोटा येथे रेफर करण्यात आले. या घटनेने खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन आणि पोलिसांमध्ये घबराट पसरली. वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी रवाना झाले आहेत आणि त्यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे. बेशुद्ध झालेल्या मुलांना सीएफसीएल रुग्णालयात नेण्यात आले जिथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले.

## कर्नाळा किल्ल्यावर मधमाशांचे मोहोळ; एकाचा मृत्यू

**पनवेल :** कर्नाळा किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या विद्यार्थी आणि इतर पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात ९ जण जखमी झाले आहेत. तर एकाचा मृत्यू झाला. तर ५ जणांची प्रकृती गंभीर आहे. यामध्ये मुंबईतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कर्नाळा किल्ल्यावर ट्रेकिंगसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर मधमाशांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. मधमाशांनी केलेल्या हल्ल्यात संदिप पुरोहित नावाच्या पर्यटकाचा मृत्यू झाला आहे. माटुंगा येथील व्हीजेटीआय महाविद्यालयाचे ६ विद्यार्थी आणि अन्य ठिकाणावरील विद्यार्थी आणि पर्यटक असे मिळून ४० ते ५० जण ट्रेकिंगसाठी पनवेलजवळील कर्नाळा किल्ल्यावर गेले होते. किल्ल्यावर झालेल्या गोंगाटामुळे मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्ल्यातील जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# केजरीवालांना पुन्हा धक्का

## 'आप'च्या 3 नगरसेवकांनी साथ सोडली; पालिकेत हादरा ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपचा धुव्वा उडवत भाजपनं जवळपास २७ वर्षांनी पुन्हा एकदा सत्ता खेचून आणली. ७० पैकी तब्बल ४८ जागा जिंकून भाजप सत्तेत परतलं. तर दुसरीकडे २२ जागा जिंकल्या असल्या तरी अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासारख्या आपच्या दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. यानंतर आपला आता दिल्ली महापालिकेत मोठा हादरा बसला आहे. विधानसभा निवडणुकीनंतर आता भाजप अरविंद केजरीवालांच्या आपला दिल्ली महापालिकेत धक्का देण्याची तयारीत असल्याची चर्चा आहे. याच धर्तीवर भाजपकडून आता महापालिकेतील आपच्या नगरसेवकांवर गळ टाकण्यात येत आहे. त्यात पहिल्या टप्प्यात भाजपला मोठं यश आलं आहे. तीन नगरसेवक भाजपच्या गोटात सामील झाले आहेत.

दिल्लीतील अँड्रयूज गंजमधील नगरसेविका अनिता बसोया, आरकेपूरमचे नगरसेवक धर्मवीर आणि चपराना प्रभाग क्रमांक १५२ चे नगरसेवक निखिल यांनी आपला सोडचिठ्ठी देत भाजपची वाट धरली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीतील भाजपने बहुमतामुळे मिळविलेल्या विजयानंतर आपला आता महापालिकेत हादरे देण्यास सुरुवात केली आहे. दिल्ली महापालिकेत आपच्या तीन नगरसेवकांनी प्रवेश केल्यानं आता भाजप आणि आपचं संख्याबळ समसमान झालं आहे. त्यामुळे महापौर पदाच्या निवडणुकीला दोन महिन्यांचा कालावधी बाकी असला तरी याकाळात आपच्या जास्तीत जास्त नगरसेवकांना पक्षात आणण्यासाठी मोठ्या हालचाली करण्याची शक्यता आहे.




### दिल्ली महापालिकेकडे वॉच

● दिल्ली महापालिकेच्या महापौरपदाची एप्रिलमध्ये निवडणूक होत आहे. या निवडणुकीत भाजप आपली पूर्ण ताकद पणाला लावणार आहे यात शंका नाही. त्याच दृष्टीने भाजपनं आता आपली पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. आपच्या तीन नगरसेवकांमुळे भाजपच्या संख्याबळात वाढ झाली आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप आतापासून दिल्ली महापालिकेकडे लक्ष ठेवून असल्याचे दिसून येत आहे.

"दिल्लीला विकसित भारत अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेची राजधानी म्हणून विकसित करण्यासाठी केंद्र, विधानसभा आणि नगरपालिका स्तरावर योग्यवेळी ट्रिपल इंजिन सरकार असेल. दिल्ली स्वच्छ आणि सुंदर शहर बनवण्यासाठी आज तीन नगरसेवक भाजपात सामील झाले आहेत"
**-वीरेंद्र सचदेवा**

## मंत्री शिवेंद्रसिंहराजेंचा तिकिट काढून एसटीने प्रवास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सातारा :** सातारा जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नातून एसटी महामंडळाच्या मेढा आगाराला नुकत्याच नवीन ८ एसटी बसेस मिळाल्या. या एसटी बसेसचा लोकार्पण सोहळा मेढा आगारात उत्साहात झाला. यावेळी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी तिकीट काढून एसटी बसमधून फेरफटका मारत एसटी प्रवासाचा आनंद लुटला. बसेसच्या लोकार्पण सोहळ्याला महामंडळाचे सातारा विभाग नियंत्रक रोहन पलंगे, ज्योती गायकवाड यांच्यासह जावलीचे तहसीलदार हणमंत कोळेकर, गटविकास अधिकारी निलेश पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सुरेंद्र भूतकर, शाखा अभियंता सुरेश कुंभार यांनी सुद्धा हजेरी लावली. यावेळी मेढा आगार व्यवस्थापक नीता बाबर यांच्यासह आगारातील अधिकारी वाहक, चालक व तालुक्यातील नागरिकांनी गर्दी केली होती.

जावळी तालुक्यातील बहुतांश भाग हा दुर्गम-डोंगराळ असून, या भागातुन प्रवाशांचा प्रवास सुखकर होण्यासाठी एसटी बसेसचाच पर्याय नागरिकांना निवडावा लागतो. मात्र मेढा आगारातील अनेक बसेस जुन्या झाल्या होत्या. त्यामुळे एसटी बसेस बंद होण्याचे प्रकार नेहमी घडत होते. यासाठी तालुक्यातील नागरिकांनी नवीन एसटी बसेस मिळण्याची वारंवार मागणी मेढा आगारकडे व सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांच्याकडे केली होती.



# यॅक.... ! हॉटेलमध्ये खिचडीत आढळला मृत उंदीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** मागील काही वर्षांपासून हॉटेल आणि अंगणवाडीच्या पोषण आहारात अळ्या, मेलेली पाल आढळण्याचा घटना वाढल्या आहेत. नांदेडमध्येही असाच धक्कादायक प्रकार घडला आहे. नांदेडमध्ये एका हॉटेलमध्ये खिचडीत मेलेला उंदीर आढळल्याची घटना घडली आहे. या प्रकारानंतर ग्राहकाने एकच संताप व्यक्त केला. त्यानंतर ग्राहकाने अन्न आणि औषध प्रशासनाकडे तक्रार केली आहे.

काही दिवसांपूर्वी नवी मुंबईतील अंगणवाडीतील बालकांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषणाच्या आहारात चक्क अळ्या आढळल्याची घटना घडली होती. या प्रकारानंतर पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला होता.

आहारात अळ्या आढळल्याच्या प्रकारानंतर बालकांच्या आरोग्याला धोका असल्याचे स्पष्ट केलं होतं. त्यानंतर आता नांदेडमध्ये खिचडीत उंदीर आढळल्याची घटना घडली.

### बिल नको पण चर्चा थांबवा ...

● या प्रकारानंतर संतप्त ग्राहकाने अन्न आणि औषध प्रशासनाकडे रीतसर लेखी तक्रार केली. श्रीकांत बिरादार नावाच्या या ग्राहकासोबत हा धक्कादायक प्रकार घडला आहे. त्याने हॉटेल मालकाच्या हे निदर्शनास आणून देताच हॉटेल मालकाने बिल देऊ नका पण चर्चा करू नका, अशी विनंती केल्याचे तक्रारीत म्हटले.



## परभणीत कृषिमंत्र्यांच्या छायाचित्राला जोडे मारून वादग्रस्त वक्तव्याचा निषेध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**परभणी :** 'भिकारीसुध्दा एक रूपया घेत नाही, आम्ही एक रूपयात शेतकऱ्यांना पीक विमा देतो' असे वादग्रस्त वक्तव्य राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले असून याचे तीव्र पडसाद परभणी जिल्ह्यातही उमटले आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कृषीमंत्री कोकाटे यांच्या फोटोला जोडे मारून आंदोलन केले.

कृषीमंत्री कोकाटे यांनी शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्याबरोबर केल्याने संताप व्यक्त करत शेतकऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध केला. पीक विमा घोटाळा प्रकरणात सत्ताधारी पक्षाचे लोक सामील आहेत. अद्याप त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या सरकारमधील कृषीमंत्री शेतकऱ्यांना लाचार, भिकारी संबोधून असे मूर्खासारखे वक्तव्ये करतील तर स्वाभिमानी शेतकरी संघटना त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.



# 'वक्फ' विधेयक मुस्लिमांविरोधात असल्याची दिशाभूल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू काश्मीर :** आज भारतात अनेक मुस्लिम कुटुंब श्रीमंत नाहीत. वक्फ मालमत्तेचा लाभ सर्वांना मिळाला पहिजे. काही लोक दिशाभूल करत आहेत की, वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे. पण, तसे नाही. आपल्या देश कायदा, संविधान आणि व्यवस्थेवर चालतो. सरकार किंवा कोणतीही व्यक्ती वक्फ मालमत्तेशी छेडछाडक करू शकत नाही, असे अल्पसंख्यांक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी शनिवारी (दि.१५) स्पष्ट केले.

जम्मू-काश्मीर दौऱ्यावर असलेले रिजिजू म्हणाले की, "जगात सर्वाधिक वक्फ मालमत्ता भारतात आहेत. देशात अनेक मुस्लिम कुटुंब श्रीमंत नाहीत.

त्यांनाही वक्फ मालमत्तेचा लाभ मिळाला पाहिजे, अशी केंद्र सरकारची भूमिका आहे. वक्फ दुरुस्ती विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, असे काही लोक दिशाभूल करत आहेत. आपला देश कायदा, संविधान आणि व्यवस्थेवर चालतो. सरकार किंवा कोणतीही व्यक्ती वक्फ मालमत्तेबरोबर हस्तक्षेप करु शकत नाही."

"श्रीनगरमधील हजरतबल तीर्थक्षेत्र जगभर प्रसिद्ध आहे. जम्मू-काश्मीर वक्फ बोर्डाने हजरतबल तीर्थक्षेत्राचे नूतनीकरण करण्यासाठी घेतलेल्या निर्णयाचा मला खूप आनंद आहे. राज्यांच्या वक्फ बोर्डाला पाठिंबा देणे ही माझी जबाबदारी आहे आम्ही जम्मू-काश्मीर वक्फ बोर्डाला पाठिंबा देऊ. सूफी तीर्थक्षेत्रे प्रेमाचा संदेश देतात. आम्ही अशा आणखी स्थळांचा विकास करू.
**- मंत्री किरेन रिजिजू**



# 'नुसतं देव-देव केलं तर निवडून येणार का?' अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सवाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** परतूरमध्ये अजित पवार यांनी, "नुसतं देव-देव केलं तर निवडून येणार आहे का?", असा सवाल कार्यकर्त्यांना केला. यावेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीतील त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या विजयाबाबतही भाष्य केल्याचे पाहायला मिळाले. माजी आमदरा सुरेशकुमार जेथलिया यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

त्यानिमित्ताने परतूरमध्ये पक्ष प्रवेश सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे विधान केले आहे. या विधानामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा स्पष्टवक्तेपणा आणि भाषणाच्या खुमासदार शैली पुन्हा पाहायला मिळाली.

माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मी नेहमी महाराष्ट्रामध्ये लोकांना सांगत असतो आणि तुम्हालाही सांगतो, यश आलं म्हणून हुरळून जायचे नाही आणि अपयश आलं म्हणून खचून जायचं नाही.

लोकसभा निवडणुकीत माझ्या विधानसभा मतदारसंघात माझ्या पत्नीला ४८ हजार मतं कमी पडली म्हूणून रडत बसलो नाही. पण, नुसतचं देव-देव केला तर निवडून येणार आहे का? त्यामुळे श्रद्धाही ठेवा आणि लोकांचे प्रश्नही सोडवा."



सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत संपूर्ण महायुतीला फटका बसला होता. यामध्ये सर्वाधिक फटका राष्ट्रवादीला बसला. त्यांनी लढवलेल्या ४ पैकी ३ जांगांवर पक्षाचा पराभव झाला होता. तर सुनील तटकरे हे एकमेव उमेदवार विजयी झाले होते. मात्र, त्यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दमदार कामगिरी करत सत्ता कायम राखली. तर, अजित पवार यांच्या राष्ट्रवादीलाही चांगले यश मिळाले होते.
**- अजित पवार,** उपमुख्यमंत्री


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that Ms. Laxmi Raghunath Bhujbal is the Owner / Holder of All that piece and parcel of land bearing Gat no. 3960/2/2 total adm. 00H 95.50R out of which land adm. 5.50R along with construction, situated at Village Talegaon Dhamdhere, Taluka Shirur, District Pune. The said land is purchased from Mangala Shantaram Dorge vide sale deed dt. 22/4/1994 registered in the office of Sub-registrar Talegaon Dhamdhere/Shirur at Sr. no. 483/1994. Ms. Laxmi Raghunath Bhujbal states and declares that Original sale deed dt. 22/4/1994 registered in the office of Sub-registrar Talegaon Dhamdhere/Shirur at Sr. no. 483 between Mr. Vitthal Bhikoba Bhujbal, Kailas Bhikoba Bhujbal and Laxmi Raghunath Bhujbal, along with Index II and R.R are lost and misplaced. The said owner have assured that she has clear and marketable title to the said Property. Now my client intends to obtained loan from Vastu Housing Finance Corporation Ltd and If any person, bank institution or authority having any claim, objection or interest or having in possession of above Original lost documents, should inform me on address given below within 7 days from the date of this notice.

Dated- 16/02/2025

**Adv. Vanashree G Kshirsagar**
VASTU HOUSING FINANCE CORP LTD/ CTS NO 36313, FINAL PLOT NO ZISI3, APARTMENT NO 3,SECOND FLOOR, AWING, PRATISAD, JOG CONDOMINIUM, SHIVAJI NAGAR, BHAMBURDA, HAVELI, PUNE 411004
Mob. 9823598801/ email - vanashree.kshirsagar@vastuhfc.com



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम १० (१) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५**
**जाहीर नोटीस**

**अर्जदार** **अर्ज क्र.१३७/२०२४.१५०४१**
**नियो.दि पर्ल सहकारी गृहरचना संस्था मर्या.**
पत्ताः-स.नं.१३/२(पैकी), मौजे खराडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४.
तर्फे.
मुख्य प्रवर्तक, श्री. प्रदिप वसंत प्रभाळे.

**विरुद्ध**

**जाब देणार**
१.मे.साई डेव्हलपर्स,
नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफीस पत्ताः- ४, विष्णु प्रसाद, कमला नेहरू पार्कच्या समोर,
भांडारकर रोड,एरंडवणा, पुणे- ४११ ००४. तर्फे भागीदार,
ए. श्री. रोशन रमेश दुसाणे. रा. ५अ, मंत्रिकिशोर पार्क, भोसलेनगर, शिवाजीनगर,पुणे-४११ ००७. बी.श्री. दिपक अमृत गुगळे. रा. डी-५, मंत्रिकिशोर पार्क, भोसलेनगर, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००७. सी.श्री. आत्माराम दगडू पाटील. रा. फ्लॅट नं.०७, पद्मावती हौसिंग सोसायटी, रामदासवाडी सिंडीकेट, कल्याण- ४१२ ३०१.
डी. श्री. पंकज जनार्दन जांभळे. रा. ५- अ, मंत्रीकिशोर पार्क, भोसलेनगर, शिवाजीनगर, पुणे- ४११००७.
ई.श्री.संजय वसंत दळवी. रा. अ-४१, पिनीकीन को ऑप हौ. सोसा., पंडीत दिनदयाळ, कास रोड, साकी नाका, डोंबीवली वेस्ट, मुंबई-४२१ २०२.
२.उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. दि पर्ल सहकारी गृहरचना संस्था मर्या., पत्ताः- स.नं. १३/२ (पैकी), मौजे खराडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०१४ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.१३७/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १३/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १ए ते १ई गैरहजर. सबब जाब देणार क्र. १ ते १ई यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.११/०३/२०२५ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १ ते १ई यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे, दिनांकः १४/०२/२०२५.

शिक्का

**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस.**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५**
**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४२३ / २०२४/९९६०**
**अर्जदार**
**साई लॉरेल पार्क फेज || सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**
पत्ताः स.नं. ४७(पैकी), प्लॉट नं. ए, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०२१. तर्फे, अध्यक्ष : श्री. रणजीत उग्रसेन खराडे, सचिव : श्री. सुजित बाबुराव लोहारकर

**विरुद्ध**

**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / जाब देणार नं. १
१. मे. जगताप पाटील प्रमोटर्स अँड बिल्डर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- स.नं. ७९/१, चंद्ररंग पार्क, सुदर्शन नगर, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२१. तर्फ भागीदार, ए. श्री. विजय पांडूरंग जगताप, बी. श्रीमती. शोभा रामदास जगताप,
सी. श्री. राजेंद्र आप्पासाहेब जगताप, डी. श्री. चिराग जयजिंग जगताप, ई. सौ. रेश्मा सुनिल कवडे, एफ. श्री. आदित्य लक्ष्मण जगताप, ए ते एफ सर्व रा. पत्ता- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०२१.
२. पांडुरंग खंडूजी जगताप (मयत) चंद्रभागा पांडुरंग जगताप (मयत)
मयत तर्फे वारस, ए. श्री. विजय पांडुरंग जगताप, बी. जनाबाई साहेबराव उंद्रे, सी. सविता बाबासाहेब साखरे डी. अलका दत्तात्रय झेंडे, ई. श्री. शंकर पांडुरंग जगताप, एफ. सौ. वासंती विजय रेणुसे
लक्ष्मण पांडुरंग जगताप (मयत) मयत तर्फे वारस
जी. श्रीमती. अश्विनी लक्ष्मण जगताप, एच. ऐश्वर्या विराज रेणुसे, आय. आदित्य लक्ष्मण जगताप
कै. भिकाबाई अप्पासाहेब जगताप (मयत) मयत तर्फे वारस
कै. जयसिंग अप्पासाहेब जगताप (मयत) मयत तर्फे वारस
जे. श्रीमती. संजना जयसिंग जगताप, के. ज्योती उर्फ मनिषा गणेश गायकवाड,
एल. शितल नितीन इंगवले, एम. रेश्मा सुनिल कवडे, एन. रूपाली प्रसाद देवकर, ओ. किरण मोहन काळभोर,
पी. काजल गणेश कुऱ्हाडे, क्यु. चिराग जयसिंग जगताप,
कै. रामदास आप्पासाहेब जगताप (मयत) तर्फे वारस
आर. श्रीमती. शोभा रामदास जगताप, एस. राजेंद्र अप्पासाहेब जगताप,
जाब देणार ए ते एस सर्व रा. पत्ता- पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२१.
(जाब देणार नं. २ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १ )
इतर संस्था / जाब देणार नं. ३
३. वाणिज्य इमारत सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः स. नं.४७(पैकी), प्लॉट नं. ए, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०२१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये साई लॉरेल पार्क फेज 11 सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ताः स.नं. ४७ (पैकी), प्लॉट नं. ए, पिंपळे गुरव, ता. हवेली, जि. पुणे- ४११ ०२१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ४२३ / २०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २८/०१/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. समृद्धी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक १८/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : ११/०२/२०२५

शिक्का

**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



'आपण इतके फिरकीपटू दुबईला घेऊन जात आहोत, हे काही मला समजलेलं नाही. ५ फिरकीपटू आणि आपण यशस्वी जैस्वालला बाहेर बसवलेलं आहे. हो मी हे समजू शकतो की एकाद्या दौऱ्यावर ३-४ फिरकीपटू घेऊन जात आहोत, पण दुबईमध्ये ५ फिरकी गोलंदाज? मला हे कळत नाही.' 'मला वाटतं आपण एक-दोन फिरकी गोलंदाज ज्यादाचे घेतले आहेत. दोन डावखुरे फिरकीपटू, जे तुमचे सर्वोत्तम अष्टपैलूही आहेत, ते हार्दिक पांड्यासोबत खेळतील. त्यामुळे अक्षर आणि जडेजा हे संघात असतील.' 'हार्दिकही संघात असेल आणि कुलदीप असेल. अशात आता जर तुम्हाला वरुण चक्रवर्तीही संघात हवा असेल, तर तुम्हाला एका फिरकी गोलंदाजाला बाहेर ठेवावं लागेल आणि हार्दिकला तुमचा दुसरा वेगवान गोलंदाज म्हणून वापरावं लागेल. किंवा तिसरा वेगवान गोलंदाज आणण्यासाठी तुम्हाला एका फिरकीपटूला बाहेर बसवावं लागेल.' — आर अश्विन

# बंगळुरूने गुजरातला हरविले

## १६ सिक्स अन् ४०३ धावा! : पहिल्या सामन्यात विक्रमांचा पाऊस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**वडोदरा :** वूमन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेला दणक्यात सुरुवात झाली आहे. पहिल्याच सामन्यात चौकार-षटकारांचा पाऊस चाहत्यांना पाहायला मिळाला. तब्बल ४०० हून अधिक धावा पहिल्याच सामन्यात निघाल्या. स्मृती मानधनाच्या नेतृत्वात खेळणाऱ्या गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने गुजरात जायंट्स संघाला ६ विकेट्सने पराभूत केले. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसमोर गुजरात जायंट्सने २०२ धावांचे मोठे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग बंगळुरूने १८.३ षटकात पूर्ण केला.

बंगळुरूकडून ऋचा घोषने तुफानी फलंदाजी करताना २७ चेंडूत ७ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ६४ धावा केल्या. तिला कनिका अहुजाने १३ चेंडूत नाबाद ३० धावा करत चांगली



साथ दिली. तसेच एलिस पेरीनेही ३४ चेंडूत ५७ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.

तत्पुर्वी गुजरातच्या फलंदाजांनीही चांगली कामगिरी केली. कर्णधार ॲश्ले गार्डनरने ३७ चेंडूत ३ चौकार आणि ८ षटकारांसह ७९ धावांची नाबाद खेळी केली. तसेच बेथ मुनीने ४२ चेंडूत ५६ धावांची खेळी केली. त्यामुळे गुजरातने २० षटकात ५ बाद २०१ धावा केल्या होत्या.

बंगळुरूने २०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग केल्याने त्यांनी वूमन्स प्रीमियर लीगमध्ये सर्वोच्च धावांचा यशस्वी पाठलाग करण्याचा विक्रमही नावावर केला. यापूर्वी मुंबई इंडियन्सने गुजरातविरुद्धच गेल्यावर्षी १९१ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता.

तसेच महिलांच्या टी२० क्रिकेटमध्ये २०० पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग होण्याची ही फक्त दुसरीच वेळ ठरली. यापीर्वी २०२३ मध्ये वेस्ट इंडिया महिला संघाने २१३ धावांचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध यशस्वी पाठलाग केला होता.

### ऋचा, कनिकाची विक्रमी भागीदारी

- ऋचा आणि कनिका यांच्याच पाचव्या विकेटसाठी नाबाद ९३ धावांची भागीदारी झाली होती. त्यामुळे वूमन्स प्रीमियर लीगमध्ये पाचव्या विकेटसाठी झालेली ही सर्वोच्च भागीदारी ठरली. यापूर्वी दिल्ली कॅपिटल्ससाठी २०२३ मध्ये युपी वॉरियर्सविरुद्ध जेमिमाह रोड्रिग्स आणि जेस जोनासन यांनी पाचव्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली होती.
- तसेच ऋचा आणि कनिका यांनी १५.०८ च्या रनरेटने ९३ धावा केल्या. त्यामुळे वूमन्स प्रीमियर लीगमध्ये ५० पेक्षा अधिकची भागीदारी करताना हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च रनरेटही ठरला.

### सर्वाधिक धावा

- रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध गुजरात जायंट्स संघात झालेल्या या सामन्यात एकूण ४०३ धावा निघाल्या. त्यामुळे वूमन्स प्रीमियर लीगमध्ये एका सामन्यात झालेल्या या सर्वाधिक धावा ठरल्या. यापूर्वी या दोन संघातच २०२३ मध्ये झालेल्या सामन्यात ३९१ धावा चोपल्या गेल्या होत्या.

### ॲश्ले गार्डनरचा विक्रम

- ॲश्ले गार्डनर हिने ८ षटकार तिच्या खेळीदरम्यान मारले. त्यामुळे वूमन्स प्रीमियर लीगमध्ये एका सामन्यात खेळाडूने मारलेल्या सर्वाधिक षटकारांच्या विक्रमाची तिने बरोबरी केली आहे.

### तब्बल १६ षटकार

- दोन्ही संघांचे मिळून तब्बल १६ षटकार झाले. त्यामुळे वूमन्स प्रीमियर लीगमध्ये एका सामन्यात मारण्यात आलेले हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक षटकार ठरले. यापूर्वी २०२४ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स संघात बंगळुरूला झालेल्या सामन्यात १९ षटकार ठोकले होते.

## विदर्भाविरुद्ध रणजी सेमीफायनल खेळू शकतो यशस्वी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफीच्या उपांत्य सामन्यासाठी मुंबईच्या संघात भारतीय कसोटी सलामीवीर यशस्वी जैस्वालचा समावेश करण्यात आला आहे. रणजी ट्रॉफी २०२४-२५ चे दोन्ही उपांत्य सामने १७ फेब्रुवारीपासून खेळले जातील. दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबईचा सामना विदर्भाशी होईल. यशस्वीने या हंगामात एक सामना खेळला आहे. यशस्वीने जम्मू आणि काश्मीर विरुद्ध रणजी सामना खेळला, ज्यामध्ये मुंबई संघाला त्याच्या घरच्या मैदानावर पराभव पत्करावा लागला. त्या सामन्यात रोहित शर्माही खेळला होता.

जानेवारीमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघाची घोषणा झाली तेव्हा यशस्वीचा समावेश होता. पण, ११ फेब्रुवारी रोजी अंतिम संघ जाहीर झाला तेव्हा त्याच्या जागी गूढ फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीला संघात स्थान देण्यात आले. यशस्वी हा प्रवासी राखीव खेळाडू असेल, त्याच्यासोबत शिवम दुबे आणि मोहम्मद सिराज यांचाही राखीव खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे.

## झिम्बाब्वेने आयर्लंडवर ४९ धावांनी विजय मिळवला

**हरारे :** पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेने आयर्लंडवर ४९ धावांनी विजय मिळवला. शुक्रवारी हरारे येथे आयर्लंडने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने ५ विकेट्स गमावून २९९ धावा केल्या. सामनावीर ब्रायन बेनेटने १६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, आयर्लंड संघ २५० धावांवर सर्वबाद झाला. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझाराबानीने ४ आणि रिचर्ड नगारावाने ३ विकेट घेतल्या. आयर्लंडच्या एकाही खेळाडूने अर्धशतक केले नाही. कर्टिस कॅम्फरने सर्वाधिक ४४ धावा केल्या. झिम्बाब्वेने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बेन करन आणि ब्रायन बेनेट यांनी ९५ धावांची भागीदारी केली. करण २८ धावा करून बाद झाला. कर्णधार क्रेग एर्विनने बेनेटसोबत १३६ धावांची भागीदारी केली. इर्विन ६६ धावा करून बाद झाला. ८-८ धावा काढल्यानंतर सिकंदर रझा आणि वेस्ली मधवेरे पॅव्हेलियनमध्ये परतले. ५० व्या षटकात १६९ धावांवर बाद होण्यापूर्वी बेनेट एका टोकाला टिकून राहिला. त्याच्या खेळीच्या मदतीने संघाने ५ विकेट गमावल्यानंतर २९९ धावा केल्या. जोनाथन कॅम्पबेल ६ धावांवर आणि टी मुरुमनी २ धावांवर नाबाद राहिले. आयर्लंडकडून मार्क अदायरने २ विकेट घेतल्या. जोशुआ लिटल, ग्राहम ह्यूम आणि अँडी मॅकब्राइन यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.



## न्यूझीलंडने तिरंगी मालिकेच्या ट्रॉफीवर कोरले नाव



**नवी दिल्ली :** न्यूझीलंडने तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानचा ५ विकेट्सने पराभव करत जेतेपद पटकावले. किवी संघाने २८ चेंडू शिल्लक असताना हा सामना जिंकला आहे. या विजयामुळे २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी न्यूझीलंड संघाचे मनोबल वाढेल. डॅरिल मिशेल आणि टॉम लॅथम या दोघांनीही अर्धशतके झळकावून न्यूझीलंडला अंतिम सामना जिंकण्यास मदत केली. संपूर्ण मालिकेत एकही सामना न गमावता न्यूझीलंडने ट्रॉफीवर कब्जा केला आहे. कराचीच्या राष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकिस्तान संघाने प्रथम फलंदाजी करताना २४२ धावा केल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अगदी आधी, दबावाने भरलेल्या सामन्यात पाकिस्तान संघाचा कोणताही खेळाडू अर्धशतकही झळकावू शकला नाही, ही लाजिरवाणी गोष्ट आहे. कर्णधार मोहम्मद रिझवान व्यतिरिक्त सलमान आघाने पुन्हा एकदा पाकिस्तान संघाची लाज राखण्याचा प्रयत्न केला. रिझवान आणि सलमान यांनी अनुक्रमे ४६ आणि ४५ धावा केल्या. तैय्यब ताहिरनेही ३८ धावांचे योगदान देत पाकिस्तानला २४२ धावांपर्यंत पोहोचवले.

## महाराष्ट्र केसरी ठरले
## पदकाचे मानकरी, हर्षवर्धन, अमृताला कास्यपदक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तब्बल दशकानंतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आखाड्यात महाराष्ट्राने पदकाचा षटकार झळकविला आहे. या चमकदार कामगिरीत महाराष्ट्र केसरी विजेत्या मल्लांनीही ठसा उमटविला. भाग्यश्री फंड पाठोपाठ हर्षवर्धन सदगीर, अमृता पुजारी हे महाराष्ट्र केसरी विजेते मल्ल राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकाचे मानकरी ठरले आहेत.

रोशनाबाद येथील योगस्थळ हॉलमधील कुस्ती मैदानात सलग तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राचा डंका घुमला. महाराष्ट्र केसरीच्याच फ्रीस्टाईल 125 किलो वजनी गटात हर्षवर्धन सदगीरने कांस्यपदकावर नाव कोरले. दिल्लीच्या लक्ष्य विरूध्द झुंजताना नाशिकच्या हर्षवर्धनने तीन गुणांची आघाडी घेतली होती. दुसऱ्या फेरीत लपेट डावावर चितपट कुस्ती





करीत त्याने कास्यपदक जिंकले.

पुण्यात 2020 साली महाराष्ट्र केसरीची गदा उंचविणाऱ्या हर्षवर्धनचे हे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक होय. याच वर्षी बंगलोरमधील वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेतही त्याने रूपेरी पदक पटकावले होते. महाराष्ट्र केसरी नंतर दुखापतीवर मात करून तो पुन्हा राष्ट्रीय पदक विजेता ठरला आहे. हर्षवर्धन हा पुण्यातील आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलातील काका पवार यांचा पठ्ठा आहे.

## महाराष्ट्राचे दुसऱ्यांदा पदकांचे द्विशतक; ५४ सुवर्णांसह २०१ मेडल्सवर मोहोर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या खेळाडूंनी गुजरात, गोवानंतर उत्तराखंड येथील राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये ५४ सुवर्ण, ७१ रौप्य व ७६ ब्राँझ अशी एकूण २०१ पदकांची माळ आपल्या गळ्यात घातली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी गोव्यातील राष्ट्रीय स्पर्धेतही २२८ पदकांची कमाई केली होती. याप्रसंगी सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या खेळाडूंना दोनशेच्यावर पदकांवर नाव कोरता आले आहे, हे विशेष. यंदाच्या स्पर्धेतील सर्वोत्तम राज्य विजेतेपदाचा मान महाराष्ट्रालाचा मिळाला.

उत्तराखंडमधील राष्ट्रीय स्पर्धेत पदकांची मजल द्विशतकापर्यंत नेणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य ठरले आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी मल्लखांबपटूंच्या यशाने



महाराष्ट्राला २०० पदकांचा पल्ला ओलांडता आला. यामुळे पदक तक्त्यात महाराष्ट्राला दुसऱ्या स्थानावर झेप घेता आली. गत गोवा स्पर्धेत महाराष्ट्राने ८० सुवर्ण, ६७ रौप्य व ७९ ब्राँझ, अशी एकूण २२८ पदकांची लयलूट करीत ऐतिहासिक कामगिरी केली होती. यंदाही २०० पदकांचा पल्ला ओलांडत महाराष्ट्राने ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

तब्बल २७ क्रीडा प्रकारांत महाराष्ट्राने पदके जिंकण्याची कामगिरी केली आहे. जिम्नॅस्टिक्समध्ये सर्वाधिक १२ सुवर्णांसह २४ पदके महाराष्ट्राने जिंकली आहेत. महाराष्ट्राने कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्राने सर्वाधिक २०१ पदके पटकावली असली तरी पदकतालिकेत सर्व्हिसेसचा संघ पहिल्या स्थानावर आहे, कारण त्यांनी ६८ सुवर्णपदके कमावली आहेत. त्यांनी एकूण १२१ पदके पटकावली असली तरी सर्वाधिक सुवर्णपदकांच्या संख्येनुसार त्यांचा संघ पहिल्या स्थानावर असून, महाराष्ट्राचा संघ दुसऱ्या स्थानावर आहे, मात्र एकूण सर्वाधिक २०१ पदके पटकावत महाराष्ट्राने वर्चस्व कायम राखले आहे.

## रेयांश हुंदलानी, हृदवी लिमकर, सयान कुवड यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन लक्ष्मण जगताप टेनिस अकादमी टेनिस ब्रॉन्झ सिरिज टेनिस 2025 स्पर्धेत रेयांश हुंदलानी, हृदवी लिमकर, सयान कुवड यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. लक्ष्मण जगताप टेनिस अकादमी, सांगवी येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत ८ वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत रेयांश हुंदलानी याने शौर्य कलावागटूचा ७-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. १० वर्षाखालील मुलींच्या गटात अंतिम फेरीत हृदवी लिमकरने प्रग्या जैनचा ७-२ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. मुलांच्या गटात अंतिम फेरीत सयान कुवडने तनुष सोपलचा ७-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्यांना करंडक, प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण म्हाळुंगेचे माजी सरपंच पांडुरंग पाडाळे, लक्ष्मण जगताप टेनिस अकादमीचे संचालक युवराज कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## श्रीनगर अंतिम फेरीत : हैदराबादचा ८ गडी राखून पराभव; अंतिम फेरीत मुंबई विरुद्ध सामना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग सीझन-२ च्या एलिमिनेटरमध्ये श्रीनगरने हैदराबादचा ८ विकेट्सने पराभव केला. यासह संघाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नाणेफेक गमावल्यानंतर हैदराबादने फलंदाजी केली आणि १० षटकांत ८९/६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, श्रीनगरच्या सागर अलीच्या अर्धशतकाच्या जोरावर संघाने ८.४ षटकांत ९२ धावा करून लक्ष्य गाठले. आज अंतिम फेरीत संघ माझी मुंबईशी सामना करेल.

मन्सूरने नाबाद 46 धावा केल्या हैदराबादची सुरुवात खराब झाली.



संघाने पहिल्या ५ विकेट फक्त २४ धावांत गमावल्या. सलामीवीर किसन सातपुते (६ धावा), पद्मेश म्हात्रे (५ धावा), आकाश जांगिड (० धावा), परबज्योत सिंग (२ धावा), विश्वजीत ठाकूर (१० धावा) बाद झाले. श्रीनगरकडून राजेश सोरतेने ३ विकेट्स घेतल्या.

मधल्या फळीतील फलंदाज मन्सूरने हैदराबादच्या डावाची जबाबदारी घेतली. त्याने जलद खेळ केला आणि १९ चेंडूत ४६ धावा केल्या. त्याने डावात ३ चौकार आणि ३ षटकारही मारले, त्याला संघाचे कर्णधार संभाजी पाटील यांनी चांगली साथ दिली. त्याने ७ धावा केल्या.

सागरने एका षटकात ४३ धावा केल्या स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा सागर अलीने शानदार फलंदाजी केली. त्याने २६ चेंडूत ५३ धावा केल्या. डावात २ चौकार आणि ५ षटकार मारले. या ५ षटकारांमध्ये सागरने विश्वजीत ठाकूरच्या एका षटकात सलग ४ षटकार मारले. आयएसपीएलच्या ५०-५० षटकांत सागर आणि संस्कार यांच्या जोडीने २९ धावा केल्या. या षटकाच्या नियमांनुसार, श्रीनगरने केलेल्या धावांच्या निम्म्या धावा मिळाल्या.

## लोणीकंद येथे रंगणार १ ली ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने १ ल्या वरिष्ठ ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी लोणीकंद मधील हिंद केसरी मैदान येथे ही स्पर्धा होणार आहे. जिल्हा कुस्तीगीर तालीम संघ पुणे यांच्या सहकार्याने व पै. ओंकार कंद युवा फाऊंडेशन, श्री प्रदीपदादा कंद युवा मंच यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिली.

स्पर्धेचे उद्घाटन राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार राहुल कुल, कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस व सरचिटणीस योगेश दोडके यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

संदीप भोंडवे म्हणाले, या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाची मान्यता असलेले ६ महानगरपालिका व ३६ जिल्हा असे एकूण ४२ जिल्हा कुस्तीगीर संघ सहभागी होणार आहेत. एकूण १० वजनगटामध्ये ३७५ ते ४०० कुस्तीगीर स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी ३० तांत्रिक अधिकारी ( पंच ) निवडण्यात आले असून ग्रीको रोमन महाराष्ट्र केसरी किताबासाठी ८७ ते १३० किलो हा वजनगट निश्चित करण्यात आलेला आहे

## दुखापत होणारच ना' बुमराबद्दल कपिल देव स्पष्टच बोलले

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाला सध्या मुख्य खेळाडूंच्या दुखापतींची चिंता सतावत आहे. भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहही पाठीच्या दुखापतीमुळे सध्या क्रिकेटपासून दूर आहे, तर मोहम्मद शामीच्या तंदुरूस्तीवरही सध्या प्रश्नचिन्ह आहे. तसेच नुकतेच चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघात निवडलेला वरुण चक्रवर्तीच्याही पोटरीला सुज आल्याचे बीसीसीआयने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या सामन्याआधी सांगितले होते. अशात भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कपिल देव यांनी खेळाडूंच्या वाढत्या दुखापतींबाबत चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, वर्षातील १० महिने क्रिकेट खेळत असल्यामुळे खेळाडूंच्या दुखापतींमध्ये वाढ होताना दिसत आहे.

## नाशिकच्या आकाश शिंदेकडे महाराष्ट्र पुरुष संघाचे नेतृत्व ; कबड्डी स्पर्धेसाठी संघ जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या पुरुष कबड्डी संघाची घोषणा शुक्रवारी करण्यात आली. ओडिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राच्या संघाची निवड करण्यात आली. नाशिकच्या आकाश शिंदेकडे पुन्हा एकदा या संघाच्या नेतृत्वाची धुरा देण्यात आली आहे. ओडिसा, कटक येथील जे. एन. बंदिस्त क्रीडा संकुल येथे २० ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ही स्पर्धा खेळविण्यात येईल. गतवर्षी अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाने उपांत्य फेरीत धडक देत तृतीय क्रमांक मिळविला होता.



महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतही पदकांची लयलूट केली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये ५४ सुवर्ण, ७१ रौप्य व ७६ ब्राँझ अशी एकूण २०१ पदकांची माळ आपल्या गळ्यात घातली. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी गोव्यातील राष्ट्रीय स्पर्धेतही २२८ पदकांची कमाई केली होती. याप्रसंगी सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या खेळाडूंना दोनशेच्यावर पदकांवर नाव कोरता आले आहे, हे विशेष. यंदाच्या स्पर्धेतील सर्वोत्तम राज्य विजेतेपदाचा मान महाराष्ट्रालाचा मिळाला.

### महाराष्ट्राचा कबड्डी संघ

- पुरुष संघ : १) आकाश शिंदे - संघनायक २) आकाश रूडले ३) शंकर गदई ४) तेजस पाटील ५) संकेत सावंत ६) अक्षय सूर्यवंशी ७) मयूर कदम ८) शिवम पठारे ९) प्रणय राणे १०) अजित चौहान ११) कृषिकेश भोजने १२) संभाजी वाबळे. प्रशिक्षक : प्रताप शेट्टी. व्यवस्थापक : सचिन शिंदे.

## टीम इंडिया दुबईला रवाना
# चॅम्पियन ट्रॉफी २०२५ साठी भारतीय संघ सज्ज!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बुधवारपासून सुरू होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी सामन्यासाठी भारतीय संघ दुबईला रवाना झाला आहे. भारतीय संघ २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरूद्ध स्पर्धेतील पहिला सामना खेळणार आहे. इंग्लंडला घरच्या मैदानावर व्हॉईटवॉश करून दुबईसाठी निघालेला भारतीय संघ एकही सराव सामना न खेळता थेट मैदानात उतरणार आहे. अनुवभी व नवख्या खेळाडूंचे मिश्रण असलेला भारतीय संघ उद्यापासून दुबईच्या मैदानावर चॅम्पियन्स ट्रॉफीची



तयारीला सुरू करेल.

भारतीय खेळाडू व सपोर्ट स्टाफ मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज एअर पोर्ट बसमधून उतरताना दिसले.

यावेळी बीसीसीआयने प्रवासाचा नवीन नियम घालून दिल्यामुळे सर्व खेळाडू यावेळी एकत्रित प्रवास करताना पाहायला मिळत आहेत. यावेळी रोहित शर्मा, विराट कोहली व हार्दिक पांड्या व इतर भारतीय खेळाडू व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.

तीन आठवड्यांची ही स्पर्धा असल्यामुळे बीसीसीआयच्या नव्या आचारसंहितेनुसार एवढ्या कमी कालावधीसाठी कुटुंबाला दौऱ्यावर नेण्यास परवानगी नाही. या नव्या धोरणानुसार एखादा दौरा ४५ दिवसांचा असेल तर जास्तीत जास्त दोन आठवड्यांपर्यंत कुटुंबाला दौऱ्यावर नेण्यास परवानगी आहे. एका सिनियर खेळाडूने पत्नीला दौऱ्यावर नेण्याबाबत बीसीसीआयकडे विचारणा केली होती; पण बीसीसीआयने त्याला नकार दिला.

- **भारताचा संघ :** रोहित शर्मा ( कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, लोकेश राहुल, ऋषभ पंत, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद शामी, अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा, वरुण चक्रवर्थी